www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 191 वा गुरुवार दि. 27 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# 'आम्हाला दोषी कसे ठरवले जाते?

## 'आम्हाला दोषी कसे ठरवले जाते?' जेथे कुणाल कामराचा शो झाला त्या हॉटेलने घेतला मोठा निर्णय

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपहासात्मक गाणं रचल्यामुळं महाराष्ट्रात मोठा वाद निर्माण झाला आहे. कुणाल कामराच्या स्टँडअपनंतर शिवसैनिक आक्रमक झाले असून त्यांनी खार येथील स्टुडिओची तोडफोड केली आहे. हॅबिटेड हॉटेलमध्ये कुणाल कामरा याचा शो होता. शोनंतर या हॉटेलमध्ये घुसून तोडफोड केली आहे. त्यानंतर हॉटेलकडून या सगळ्या प्रकरणावर प्रतिक्रिया आली आहे. हॉटेलने त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेअर करत आपली भूमिका मांडली आहे. तसंच, कुणाल कामराच्या वक्तव्याशी आमचा काहीही संबंध नसून आम्ही त्यास दुजोरा देत नाही, असंही त्यांनी म्हटलं आहे. तसंच, या शोनंतर हॉटेलच्या अनिधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली आहे. कुणाल कामरा यांने शोमध्ये उपमुख्यमंत्री यांच्या उपहासात्मक गीत रचले होते. यात त्याने शिवसेनेतील फुट आणि शिवसेना-भाजप युती याबाबत गाण्यात उल्लेख केला आहे. कुणालच्या शोनंतर मोठ्या प्रमाणात हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यानंतर शिवसैनिकांनी हॉटेलची तोडफोड केली आहे. दरम्यान, सत्ताधाऱ्यांनी कुणाल कामरावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या सगळ्या प्रकरणावर ज्या हॉटेलमध्ये तोडफोड करण्यात आली. त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

**हॉटेलची प्रतिक्रिया काय?**

आमच्या हॉटेलवर करण्यात आलेल्या तोडफोडीनंतर आम्हाला धक्का बसला असून अत्यंत दुःख होतंय. कलाकार हे त्यांच्या कलात्मक रचनेच्या निवडीसाठी आणि विचारांसाठी स्वतः जबाबदार असतात. कोणत्याही कलाकाराने सादर केलेल्या परफॉर्मन्ससाठी आम्ही कधीधी सहभागी झालो नाही. परंतु, कालच्या घटनांचा आम्हाला पुन्हा विचार करायला भाग पाडले आहे. जेव्हा एखादा कलाकार मर्यादा ओलांडतो तेव्हा आम्हाला दोषी कसे काय ठरवले जाते? असा सवाल त्यांनी केला आहे.

आमच्या माध्यमातून चांगला आणि हितकारक कंटेट सादर केला जावा यासाठी आम्ही अभिव्यक्ती, कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाही किंवा अपमान केला जाणार नाही, असे कंटेट व त्यांचे संतुलन कसे साधायचे याचा मार्ग शोधून काढेपर्यंत कार्यक्रम बंद ठेवत आहोत, असं हॉटेल प्रशासनाने म्हटलं आहे. आम्ही सर्व कलाकार, प्रेक्षक आणि भागधारकांना चर्चा करण्यासाठी आणि त्यांचे विचार व मार्गदर्शन जाणून घेऊ. जेणेकरुन आम्ही कलाकारांच्या अधिकारांचादेखील आदर करू शकू, असं हॅबिटेड हॉटेलने म्हटलं आहे. तसंच, आणखी एक पोस्ट करत हॅबिटेड हॉटेलने या प्रकरणानंतर दिलगिरी व्यक्त केली आहे. कुणाल कामराचा अलीकडे प्रसारित झालेल्या व्हिडिओत हॅबिटेडचा कोणत्याही प्रकारचा सहभाग नसून त्याने व्यक्त केलेल्या मतांना आम्ही दुजोरा देत नाही. या व्हिडिओमुळं ज्यांच्या भावना दुखावल्या आहेत त्या सर्वांची आम्ही मनापासून माफी मागतो, असं हॅबिटेड हॉटेलने म्हटलं आहे. दरम्यान, द हॅबीटॅट स्टुडीओच्या अनधिकृत बांधकामावर महापालिकेने कारवाई केली आहे. मुख्य बांधकामाला लागुन उभारण्यात आलेले शेड तोडण्यात आले आहेत.

### द•ख•ल



**दैनिक युवक आधार**
पनवेल तालुक्यातील कोंडले गावातील समाजसेवक रविंद्र पाटील यांची कन्या आकांक्षा रविंद्र पाटील
हिला वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा
पाटील परिवार कोंडले

## मा.अक्षय निंबाळकर व मिथुन बारवकर यांची निवड

### सणसर यात्रा कमिटी बिनविरोध जाहीर


**दैनिक युवक आधार**
**सणसर :-विकास क्षत्रिय**



सणसर ता.इंदापूर येथील ग्रामदैवत भैरवनाथाची यात्रा परंपरेप्रमाणे अक्षयतृतीयेच्या दिवशी असती. त्या यात्रेच्या अध्यक्षपदी युवा उदयोजक मा.अक्षय सोमनाथ निंबाळकर तर खजिनदार म्हणून मिथुन बारवकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.सणसर येथील भैरवनाथ मंदिरात सोमवारी सकाळी 9 वाजता या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी गावातील ग्रामस्थ व जेष्ठ नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. भैरवनाथ यात्रा अध्यक्ष पदासाठी उदयोजक अक्षय निंबाळकर व मिथुन बारवकर यांची खजिनदार पदी बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी जेष्ठ मंडळी म्हणून माजी सरपंच विजयसिंह निंबाळकर,माजी सरपंच पै.पांडुरंग निंबाळकर,ॲड. रणजित निंबाळकर,विजय पाटील,हेमंत निंबाळकर,सरपंच यशवंत पाटील,माजी सरपंच पार्थ निंबाळकर,माजी यात्रा कमिटी अध्यक्ष नितीन नाना निंबाळकर,कार्याध्यक्ष सुमित पाटील,सणसर सोसायटीचे चेअरमन सुशील निंबाळकर,औदुंबर निंबाळकर,माजी खजिनदार आबासाहेब भोईटे,आबासाहेब निंबाळकर,राहुल पाटील,दत्तात्रय काळे,विजय भाग्यवंत,राहुल जगताप,विक्रम भैया निंबाळकर,सागर महाराज गुप्ते,गणेश भोसले,आदी मोठया प्रमाणात ग्रामस्थ व युवक वर्ग उपस्थित होता.

## बेलवाडी शाळेचे दोन विद्यार्थी ' नवोदय ' साठी पात्र..

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना**
**(अशोक ढोके)**



दि. 26 - जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला असून या परीक्षेत बेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने दैदीप्यमान कामगिरी करत यश मिळविले आहे. या विद्यालयाचे प्रणिता दिगंबर सरगर व शिवम बाळू चोरमले हे दोन विद्यार्थी नवोदय साठी पात्र ठरले आहेत. शैक्षणिक वर्ष 2025-26 च्या इयत्ता 6 च्या प्रवेश प्रक्रियेसाठी नवोदय विद्यालयामार्फत आयोजित केलेल्या परीक्षेचा निकाल दि. 25 मार्च रोजी जाहीर झाला असून यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलवाडीच्या विदयार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत यश मिळविले. या विद्यालयाचे दोन विद्यार्थ्यांनी यश मिळवले . या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी जोशी,विस्ताराधिकारी सोळंके,केंद्रप्रमुख बिरादार सर,शाळेचे मुख्याध्यापक वाघ सर, जोगदंड सर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. दरम्यान, बेलवाडी सारख्या छोट्याशा गावात शिक्षण घेऊन उज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर संपूर्ण बेलवाडी गावात कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने घरकुल धारकांना मोफत रेती मिळण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांना दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**
**राळेगावः-(दि.२५)**




युवा ग्रामीण पत्रकार संघटना राळेगाव यांच्या वतीने दिनांकः- २५/०३/२०२५ ला राळेगाव येथील उपविभागीय अधिकारी विशाल खत्री,तहसिदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार पंचायत समिती राळेगाव यांना तालुक्यातील घरकुल धारकांना व विहीर बांधकाम धारकांना शासनाकडून मोफत रेती उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन देण्यात आले, शासन गोरगरीब जनतेला घरकुल देतात परंतु रेती अभावी त्या गोरगरीब जनतेचे घर बांधणी होत नाही पंचायत समिती पातळीवर नोटीसा देण्यात येतात की इतक्या दिवसात घर पूर्ण करा परंतु रेती नसल्यामुळे घर पूर्ण होऊ शकत नाही शासन फक्त घोषणा करतात की घरकुलधारकांना मोफत रेती मिळणार परंतु त्याची मात्र अंमलबजावणी करताना दिसत नाही, राळेगाव तालुक्यामध्ये वर्धा नदी लागून असल्याने तालुक्यामध्ये अनेक रेतीचे घाट आहे, परंतु ते लिलाव न झाल्याने सर्व अडचणी निर्माण होतानी दिसत आहे, तरी सर्व रेती घाट लिलाव करण्यात यावे अशी जनता बोलतानी दिसत आहे, राळेगाव तालुक्यातील सर्व घरकुल धारकांना व विहीर बांधकाम धारकांना लवकरात लवकर शासनाकडून मोफत रेती उपलब्ध करून देण्यात यावे यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघटना राळेगाव च्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष संजय कारवटकर, युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे राळेगाव तालुका अध्यक्ष खुशाल वानखेडे, कार्याध्यक्ष उमेश कांबळे, सचिव शशीम कांबळे, उपाध्यक्ष लोकेश दिवे, संघटक गोपीचंद ढाले, कोषाध्यक्ष असलम पठाण, प्रसिद्ध प्रमुख अरविंद कोडापे, सदस्य कैलास कोडापे,जितेंद्र खोडे,शंकर पंधरे,रंजत चांदेकर, जगदीश गोबाडे, सुरज ढाले, बंडु भारसकरे, महादेव टेकाम, सुरज पत्रकार हे सर्व पत्रकार हजर होते

## मराठवाड्यातील विविध विकास प्रश्नांच्या अनुषंगाने केंद्रीय गृहमंत्र्यांशी खा.गोपछडे यांची चर्चा

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड** : मराठवाड्यातील पाणीपुरवठ्यासह मूलभूत सोयी सुविधांच्या अनुषंगाने खा.डॉ.अजित गोपछडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमितशाहा यांची भेट घेऊन चर्चा केली. मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी निधीची विशेष तरतूद करावी अशी मागणी ही यावेळी खासदार गोपछडे यांनी केली आहे . स्वतंत्र भारतामध्ये मराठवाडा तब्बल एक वर्षानंतर स्वतंत्र झाला त्यामुळे मराठवाड्याचा विकास आजपर्यंत म्हणावा तसा झाला नाही.भारतीय स्वातंत्र्याच्या 75 नंतरही मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यात आलेला नाही. मराठवाड्यातील पिण्याच्या पाण्याचे प्रश्न,कृषी सिंचनाचा प्रश्न,रोजगार,उद्योग,शिक्षण, आरग्य,ग्रामीण विकास यासह अनेक प्रश्न आजही जसेच्या तसे आहेत. मराठवाडा दुष्काळग्रस्त भाग म्हणून आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा भाग म्हणून ओळखला जातो. मराठवाड्याला लागलेला दुष्काळग्रस्ततेचा आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी हा कलंक पुसून काढण्यासाठी मराठवाड्यात विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी केंद्र सरकारने विशेष निधीची तरतूद करावी.वॉटर ग्रीडचा प्रकल्प त्वरित सुरू करून तो पूर्णत्वास न्यावा.कृषी सिंचनाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाणी वाटपाचा न्यायिक प्रश्न मार्गी लावावा याशिवाय रोजगार निर्मिती,महिला आर्थिक सक्षमीकरण,विकास,सहकार क्षेत्रासाठी दुध उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करणार,बायोगॅस योजना प्रकल्प सुरु करण्यासाठी केंद्र सरकारकडे मागणी शेतकरी व संबंधित योजना याना अनुदान देण्यात यावे व मराठवाडा विकास सिंचन,शिक्षण,कृषी,आरोग्य,रेल्वे, रोजगार,विमान उडान योजना,वीज निर्मिती प्रकल्प,नांदेड मध्ये सोयाबीन इंडस्ट्री उद्योग सुरू करण्यासाठी व नांदेड येथून मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्यासाठी आदी प्रश्न सोडवावेत यासाठी आपण स्वतः लक्ष द्यावे अशी विनंती ही खा.डॉ.अजित गोपछडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली आहे

## आम्हाला गर्व हिंदुत्वाचा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिक व्हॉट्सॲप ग्रुपची नवीन कार्यकारणी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज);**



आम्हाला गर्व हिंदुत्वाचा संपूर्ण महाराष्ट्रातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिक सदस्य असलेला ८०% समाजकारण २०% राजकारण करत सामाजिक २४ उपक्रम आतापर्यंत केलेला व्हॉट्सअप ग्रुप या ग्रुपची नवीन कार्यकारणी सदस्य रविवार दि.२३ मार्च २०२५ रोजी जाहीर करण्यात आली आहे.यावेळी(संतोष मा.पाटील-संस्थापक,संचालक,विरार विभाग)(महेंद्र रा.गुरव-संचालक,बदलापूर विभाग)(सुरेश वाडकर- अध्यक्ष,घाटकोपर विभाग) (बाळासाहेब निकम- उपाध्यक्ष,घाटकोपर विभाग)(जितेंद्र पाभरेकर-उपाध्यक्ष, अंधेरी विभाग)(लवेश म्हात्रे-सेक्रेटरी,उरण विभाग)(वासंती गोताड-उपसेक्रेटरी,अँटोपहील विभाग)(भालचंद्र उकिर्डे-उपसेक्रेटरी,कुर्ला विभाग) (सूर्यकांत कडू-खजिनदार,घाटकोपर विभाग)(सुजाता धारगळकर-उपखजिनदार, कल्याण विभाग)(सोनिया पाटील-उपखजिनदार,विरार विभाग) (रंजीत नरवणकर-कार्यालय प्रमुख,चेंबूर विभाग)(संदीप गुरव-उप कार्यालय प्रमुख,अंधेरी विभाग)(प्रवीण कोरपे-उप कार्यालय प्रमुख,मालाड विभाग)(संतोष झोळ-सल्लागार,भिवंडी विभाग)(लक्ष्मण सकपाळ-सल्लागार,घाटकोपर विभाग) (लिलाधर भोईर-सल्लागार,पनवेल विभाग)(दिलीप गावडे-कार्यकारणी सदस्य,डोंबिवली विभाग)(अनिल कांबळे-कार्यकारणी सदस्य,बदलापूर विभाग)(विलास चव्हाण-कार्यकारणी सदस्य,भाईंदर विभाग) अशा प्रकारे संपूर्ण कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे.

यावेळी नवीन कार्यकारिणी यांना आम्हाला गर्व हिंदुत्वाचा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिक व्हॉट्सअप ग्रुपच्या सर्व सदस्य परिवाराकडून अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# कुंडेवहाळ बोगद्याच्या ब्रेक थ्रू

## कुंडेवहाळ येथील बोगदा खोदण्याचा महत्वपुर्ण टप्पा पार

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**






पनवेल (प्रतिनिधी) एक्सप्रेस फ्रेट रेल्वे कॉन्सोर्टियम प्रकल्पांतर्गत वैतरणा ते जेएनपीटी मार्गावरील कुंडेवहाळ येथील बोगदा खोदण्याचा महत्वपुर्ण टप्पा पार पडला असून बोगद्यातील सर्व लाईन टाकण्याचे व इतर काम लवकरच पूर्ण होणार असल्याचा विश्वास डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडचे एमडी प्रवीण कुमार यांनी आज कुंडेवहाळ येथे बोगद्याच्या ब्रेक थ्रू सोहळ्यावेळी व्यक्त केला. कुंडेवहाळ येथील बोगदा हा वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर च्या जेएनपीटी-वैतरणा सेक्शनमधील एक महत्वाचा भाग आहे. हा प्रकल्प जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ते वैतरणा पर्यंत सुमारे १०२ किलोमीटर लांबीचा आहे. हा मार्ग भारताच्या उत्तरी भागाशी मालवाहतुकीचे दळणवळण सुधारण्यासाठी महत्वाचा मानला जातो. या मार्गामुळे जेएनपीटी आणि भारताच्या उत्तरी प्रदेशातील मालवाहतुकीत मोठी सुधारणा होणार आहे. वाहतुकीचा वेग वाढून लॉजिस्टिक्सच्या खर्चात बचत होणार होईल. तसेच पायाभूत सुविधा अधिक मजबूत होणार असून उद्योग आणि व्यापारासाठी उपयुक्त ठरणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भारताच्या मालवाहतुकीच्या नेटवर्कमध्ये आश्वासक मोठी भर पडणार आहे. वैतरणापासून ते जेएनपीटी हा १०२ किलोमीटरचा हा प्रकल्प आहे. टाटा प्रोजेक्ट लिमीटेड कंपनी हे काम करत आहेत तर सबकॉन्ट्रॅक्टर म्हणून ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड अर्थात टीआयपीएल हे काम करत आहे. त्या अनुषंगाने या प्रकल्पातील महत्वाच्या अशा कुंडेवहाळ येथील १६९ मीटर लांबीचा बोगदा खोदण्याचे काम पुर्ण झाले आहे. त्यापार्श्वभुमीवर बुधवारी कुंडेवहाळ येथे टनल ब्रेक थ्रू सोहळा पार पडला. यावेळी डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडचे एमडी प्रवीण कुमार यांनी बटन दाबून या बोगद्याचे काम पूर्ण झाल्याचे जाहीर केले. यावेळी डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडचे चीफ जनरल मॅनेजर परमजीत सिंग, टाटा प्रोजेक्ट लिमीटेडचे उप्पलपती व्यंकट कुमार, राजकुमार शर्मा, साहिल शर्मा, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, डायरेक्टर एम.पी. त्यागी, महादेव यादव, प्रकाश पाटील, यल्लालिंग दिगी, कपील कड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

यावेळी परेश ठाकूर यांनी सांगितले, या प्रकल्पामुळे मालवाहतूक वेगाने होईल आणि नॅशनल लॉजिस्टिक कॉस्ट कमी होईल, त्यामुळे वाहतूकदारांचा वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. टाटा प्रोजेक्ट लिमीटेड कंपनीकडे हे काम असून टीआयपीएल सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून योग्य वेगाने हे काम पुर्ण करत आहे, असे सांगून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. तसेच पनवेल आणि उरण मध्ये हे प्रकल्प होत असल्याने याचा फायदा परिसरातील नागरीकांना नक्कीच होईल असेही परेश ठाकूर यांनी अधोरेखित केले.

## पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ यांचा अंभोरा पोलीस ठाण्यामार्फत सत्कार करुन कौतुकाची थाप...

### अंभोरा पोलीस ठाण्यात मनुष्यबळ कमी असल्याचे मांडले गऱ्हाणे

**दैनिक युवा आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्रिया सोन्याबापू पवळ ही मुलगी नवोदित पत्रकार व आष्टी तालुक्यातील पहिली महिला पत्रकार म्हणून सन्मानित तिच्या निवडीबद्दल सर्वत्र पंचक्रोशीतुन कौतुकाची थाप होऊन सत्कार समारंभ होतं असताना काल दि.२५ रोजी अंभोरा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे साहेब यांनी नवोदित पत्रकार प्रिया पवळ यांचा सत्कार केला पुढील पत्रकारिता साठी शुभेच्छा देऊन चोरी दरोडा व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना आळा बसविण्यासाठी प्रत्येक जन सतर्क असायला हवा म्हणजे आपल्या राहत्या घरी व्यावसायिक ठिकाणी प्रत्येकाने सीसीटीव्ही कॅमेरे बसून स्वतःची सुरक्षितता व पोलीस कर्मचाऱ्यांना सहकार्य केले तर भविष्यात होणारी हानी टळली जाईल असे पोलीस स्टेशनचे सपोनि मंगेश साळवे साहेब यांनी नवोदित पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ यांचा सत्कार करताना सांगितले व त्याचबरोबर अंभोरा पोलीस ठाणे हे बीड जिल्ह्यातील सर्वात मोठे रजाकाराच्या काळातले पोलीस स्टेशन असून या पोलीस स्टेशन अंतर्गत सर्वाधिक गावे समाविष्ट आहेत त्याकरिता या पोलीस स्टेशनमध्ये म्हणावे असे मनुष्यबळ नसल्याकारणाने हवे तिथे व हक्काच्या अंतरावर पोलीस कर्मचारी जाऊ शकत नाही त्याकरिता मी स्वतः लवकरच एस पी साहेब नवनीत कॉंवत साहेब यांना निवेदन देऊन पुरेसे मनुष्यबळ द्यावे अशी विनंती करणार आहे असे पोलीस अधीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले या प्रसंगी कर्तव्यदक्ष पो. कॉ.शिवदास केदार,समाजसेवक शौकत पठाण, दैनिक पुढारीचे पत्रकार प्रेम पवळ व नवोदित सत्कारमूर्ती पत्रकार प्रिया पवळ सह अंभोरा पोलीस उपस्थित होते.

> पुरेसे मनुष्यबळ मिळण्यासाठी
> आम्ही पाठ पुरवा करु परंतु वाढत्या चोरी दरोडा या करिता आपण सतर्क राहून रात्री पेट्रोलियम करावे .
> **-समाजसेवक**
> **शौकत पठाण**



## बोनी एन्टरटेन्मेंट आणि सोनल खानोलकर आयोजित वुमेन्स डे क्रिकेट टुर्नामेंटमध्ये ईपीआरचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



वुमेन्स डे क्रिकेट टुर्नामेंट नुकताच साजरा करण्यात आला. बोनी एन्टरटेन्मेंट आणि सोनल खानोलकर आयोजित सुंदर आणि अविस्मरणीय असा हा सोहळा पार पडला.

ज्या मध्ये अनेको दिग्गज आले होते. राजकीय क्षेत्रामधील केदार दिघे यांनी या प्रसंगी स्वतः उपस्थीती नोंदवत उद्घाटन केले आणि स्त्री शक्ती बाबत मनोगत व्यक्त केले. त्याच बरोबरीने अपर्णा शहा संस्थापित अभियान ईपीआर टीमच्या कार्यरत राजदूतानी हजेरी लावली आणि हा जनजागृतीचा संदेश पोहचवला. ज्या प्रकारे आज आपण एक दिवस हा खेळण्याचा आनंद घेत आहोत, हा आनंद आपण चिरंतर टिकवू शकतो, हे ईपीआरच्या माध्यमातुन लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी टीम यशस्वी ठरली. त्याचप्रमाणे सर्व शारीरिक आणि मानसिकरित्या अजून प्रगल्भ विचार आचार करणे अत्यंत गरजेचे आहे. खाणे, खेळणे, वाचणे हे जीवनात किती महत्वाचे आहे हे उपस्थित जनसमुदायास आणि प्राप्तस्थळी उपस्थित प्रेक्षक यामध्ये हा जनजागृतीचा आवाज पोहोचवण्यास ईपीआर टीमला यश आले.

# आष्टी तालुक्यातील १२५ ग्रामपंचायतीसाठी आरक्षण जाहीर

**दैनिक युवक आधार**
**आष्टी। ए बी कदम**

तालुक्यातील १२५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत मंगळवार दि.२५ मार्च रोजी येथील तहसील कार्यालयात तहसिलदार वैशाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आले. आष्टी तालुक्यात १२५ ग्रामपंचायत सरपंच पदासाठी आरक्षण सोडती द्वारे काढण्यात आली असून अनुसूचित जातींसाठी ७ महिला तर ६ खुले असे एकूण १३ पदे आरक्षित करण्यात आली आहेत. अनुसूचित जमाती साठी २ महिला तर १ पद खुलेअसे एकूण ३ पदे, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी १७महिला तर १७ पदे खुले असे एकूण ३४ पदे खुला प्रवर्गासाठी ३८ महिला तर ३७ पदे खुली असे एकूण ७५ पदे आहेत. कासारी,




बेलगाव, सुलेमान देवळा, पिंपरी घुमरी, बीडसांगवी, महिया, पारोडी या ग्रामपंचायती अनुसूचित जाती महिलेसाठी राखीव झाले आहेत. वटनवाडी पांगुळगव्हाण, बांदखेल, पांढरी, ब्रह्मगाव, डोंगरगण या ग्रामपंचायती अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. शेरी बुद्रुक, शेरी खुर्द या दोन ग्रामपंचायती अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव झाले आहेत. खुंटेफळ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी महिला साठी अंभोरा, चिंचपूर, देसूर, देऊळगाव घाट, गहुखेल, करेवडगाव, केरूळ, खरडगव्हाण, खिळद, कुंबेफळ, मोराळा, पाटसरा, पिंपरखेड, सूंबेवाडी, बाळेवाडी, पिंपळगाव घाट, सांगवी पाटण या राखीव झाले आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्ग खुला यामध्ये अरणविहरा, बोरुडी, चिंचोली, फत्तेवडगाव हिंगणी, करेवाडी, केळसांगवी, खडकत, मांडवा, पिंपळा, पिंपरी आष्टी, सांगवी आष्टी वेलतुरी, चिखली, डोईठाण, लमाणतांडा या ग्रामपंचायतीचे सरपंच पद राखीव झाले आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी कानडी, चिचाळा, तवलवाडी, निमगाव बोडखा, पिंपळगाव दाणी, पोखरी, मातकुळी, कोयाळ धनगरवाडी, नांदा, शिराळ, सोलापूरवाडी, हाजीपुर, टाकळसिंग, नागतळा, वंजारवाडी, हनुमंतगाव, हाकेवाडी, हरिनारायण आष्टा घोंगडेवाडी, हिवरा, म्हसोबावाडी, रुई नालकोल, साबलखेड, सराटे वडगाव,शिरापूर, ठोंबळ सांगवी, सावरगाव घाट, उंदरखेल, वाळुंज, दादेगाव, पारगाव जोगेश्वरी, देवळाली, जळगाव, मंगरूळ, पांगरा, शेडाळा तर खुल्या प्रवर्गासाठी केळ, जामगाव, वाहिरा, सुरडी, कडा, कानडी खुर्द, कापसी, खुंटेफळ, पुंडी, गंगादेवी, दौलावडगाव, निमगाव चोभा, निंबोडी, टाकळी आमिया, सालेवडगाव, भातोडी, धामणगाव, करंजी, साकत भाळवणी, दैठणा, धिरडी, मातावळी, नांदूर, पिंपरी घाटा शेकापूर, बावी, देवीनिमगाव, धानोरा, घाटा पिंपरी, हातोळण, कारखेल बुद्रुक, कारखेल खुर्द, कोहिनी, सय्यदमीर लोणी, वाघळुज या ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण काढण्यात आले आहे.

## वसंत आला वसंत आला

कडुलिंबाची फुले कोवळी
अर्ध्या रात्री फुलून येती
वसंत आला, वसंत आला
साऱ्यांना ते सांगत जाती

रात्र संपता, भल्या पहाटे
बकुळ फुलांचा सडा सांडतो
गंधाने त्या अंगणामधे
आनंदाचा झरा वाहतो

सुंदर,इवली फुले सुरंगी
झाडा खाली टप टप करती
जकरंडाचे निळसर पेले
खुलून दिसती रस्त्यावरती

लाल गुलाबी घाणेरीची
निळी केशरी फुले दुरंगी
झुलता झुलता हसत राहुनी
स्वागत करती अपुले जंगी

खूरचाफ्याची फुले रेशमी
दुपार वेळी फुलून येती
दरी दरी मग भरास येता
चैतन्याने न्हाउन जाती

संध्याकाळी शुभ्र मोगरा
प्रसन्न करतो मनास साऱ्या
जुई, चमेली, निळी अबोली
नकोस झोंबू त्यांना वाऱ्या

चैत्राचे ते ऊन भयंकर
दुपारच्याला तापत जाते
बहर फुलांचा गंध सुगंधी
ताप तयाचा निर्जीव करते.

**श्रीनिवास गडकरी**
**रोहा पेन पुणे**
**केवळ नावासहितच पुढे पाठवावे**
**सर्व हक्क सुरक्षित**

# " इंडस्ट्रिअल अकाउंट्स "

## एक व्यवसायिक अभ्यासक्रम आणि व्यवसाय संधी.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी. नामदेव मंडपे**
**मंठा जालना**
**जालना जिल्ह्यातील नेक्स्ट**

अपोरचूनिटी अकॅडमी ही व्यवसायिक संस्था 1 ली ते पदवीधर विद्यार्थ्यांसाठी अनेक व्यवसायिक कोर्सेस चे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देत आहे.या वर्षापासून इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रिअल अकाउंट्स अँड मॅनेजमेंट,अहमदनगर यांच्या सहकार्याने या संस्थेने " इंडस्ट्रिअल अकाउंट्स " हा एक अभिनव अभ्यासक्रम आपल्या जिल्ह्यात सुरू करायचे ठरवले आहे.या अभ्यासक्रमातून कॉमर्स शाखेच्या विद्यार्थ्यांना इंडस्ट्रिअल अकाउंट्स,बेसिक टॅक्सेशन,ऑडिट,स्टॉक अकाउंटिंग आणि टोटल क्वालिटी मॅनेजमेंट या अत्यंत महत्वाच्या आणि हमखास नोकरी,व्यवसाय मिळवून देणाऱ्या कोर्सेसचे प्रशिक्षण सुरू करण्याचे ठरवले आहे.हे व्यवसायिक कोर्सेसचे प्रशिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात अकाउंट्स,स्टोअर्स सामान्य प्रशासन या विभागात निश्चित नोकरी मिळू शकेल.तसेच ज्या विद्यार्थ्यांना अथवा व्यावयिकाना स्वतःचा व्यवसाय सुरु करायचा आहे त्यांना हे इन्स्टिट्युट सर्वतोपरी सहकार्य करते. नेक्स्ट अपोरचूनिटी अकादमीचे संचालक श्री प्रशांत प्रधान जालना जिल्ह्यातील विद्यार्थी आणि व्यवसायिक यांना नोकरी आणि व्यवसाय यासाठी विविध प्रशिक्षण योजना सुरू करणार असल्याचे सांगितले. इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रिअल अकाउंट्स अँड मॅनेजमेंट,अहमदनगर आणि नेक्स्ट अपोरचूनिटी अकॅडमी यांचे संयुक्त विद्यमाने अनेक व्यवसायिक कोर्सेस 1 ली 10 वी आणि कॉमर्स शाखेच्या विद्यार्थ्यांना विविध शालेय कोर्सेस आणि व्यवसायिक कोर्सेसची सुरुवात गुडी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर करणार असल्याचे आमच्या प्रतिनिधींना सांगितले.




## गोष्ट नात्यांची

नाती... ही केवळ रक्ताच्या नात्याने जोडली जात नाहीत, तर विश्वास, प्रेम, आणि समर्पणाने टिकवली जातात. काही नाती जन्मासोबत मिळतात, तर काही आपण जगताना उभारतो. कधी ही नाती आपल्या जीवनाला आनंदाने सजवतात, तर कधी वेदनांचा ठसा उमटवतात.

आई-वडिलांचे नाते:
आई-वडिलांचे नाते हे सर्वांत निस्वार्थी असते. त्यांनी आपले बालपण घडवले, आपल्याला शिकवले आणि संकटांपासून वाचवले. जसजसे मोठे होत जातो, तसतसे हे नाते अधिक दृढ होते, पण कधी कधी काळाच्या ओघात आपणच त्यांना विसरतो. त्यांच्या प्रेमाला कधीही कमी लेखू नये, कारण ते आपल्या जीवनाचा पाया असतात.

**भावंडांचे नाते:**
भावंडांचे नाते म्हणजे बालपणाची गोड आठवण. लहानसहान भांडणं, खोड्या, आणि एकमेकांसाठी उभारून राहण्याची सवय हे नाते खास बनवते. मोठे झाल्यावर मार्ग वेगळे जरी झाले, तरी बालपणाच्या गोड आठवणी कायम आपल्या मनात असतात.

**मैत्रीचे नाते:**
मैत्री हे एक असे नाते आहे, जे आपण निवडतो. सच्चा मित्र हा आपल्या आनंदात आणि दुःखात सोबत असतो. हे नाते जन्मजात नसते, पण प्रेम आणि विश्वासाच्या बंधाने कायम टिकवता येते.

**पत्नी-पतीचे नाते:**
या नात्याचा पाया प्रेम, समजूतदारपणा आणि एकमेकांसोबत घालवलेला काळ असतो. जीवनातील सर्व सुख-दुःख वाटून घेणारे हे नाते एकमेकांच्या विश्वासावर उभे असते.

**समाजातील इतर नाती:**
कधी कधी काही लोक आपल्याला रक्ताच्या नात्याइतकेच जवळचे वाटतात. शेजारी, सहकारी, मार्गदर्शक, गुरु – ही नाती आयुष्य समृद्ध करतात.

**नात्यांचे महत्त्व:**
नाती टिकवण्यासाठी संवाद, विश्वास, आणि समर्पण महत्त्वाचे असते.
कोणतेही नाते तणावमुक्त ठेवण्यासाठी अहंकार दूर ठेवावा लागतो.
वेळोवेळी प्रेम व्यक्त करणे, मदतीसाठी पुढे येणे, आणि एकमेकांना समजून घेणे आवश्यक आहे.

**नाती जपायची कशी?**



प्रेम आणि आपुलकी दाखवा – बोलून, कृतीतून प्रेम व्यक्त करा. सन्मान द्या – नात्यात परस्पर सन्मान महत्त्वाचा आहे. समजूतदारपणा ठेवा – प्रत्येक माणसाला त्याचे विचार आणि भावना असतात. वेळ द्या – नातेसंबंध मजबूत करण्यासाठी एकत्र वेळ घालवणे गरजेचे आहे. क्षमाशील राहा – चुका क्षमा करणे नात्यांना अधिक मजबूत बनवते. नाती कमवायला वेळ लागतो, पण तोडायला काही क्षणही पुरेसे असतात. म्हणून प्रत्येक नात्याला प्रेम आणि विश्वासाने जपा. आयुष्यात पैसा, यश मिळेल, पण खरी श्रीमंती प्रेमळ नात्यांमध्ये असते. "नाती जन्माने मिळतात, पण ती जपणे आपल्या हाती असते."

**कु. भाग्यश्री विरकर**

# कोलोरेक्टल कॅन्सर साठी अपोलोने सुरु केला सर्वसमावेशक स्क्रीनिंग कार्यक्रम

## बदललेल्या जीवनशैलीमुळे आतड्याच्या कर्करोगात वाढ

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

**नवी मुंबई,** २६ मार्च २०२५ :भारतामध्ये कोलोरेक्टल कॅन्सरच्या केसेस सतत वाढत आहेत. कोलोरेक्टल कॅन्सर सुरुवातीच्या टप्प्यात ओळखू यावा आणि त्याला प्रतिबंध घातला जावा यासाठी अपोलो कॅन्सर सेंटर्सने एक सर्वसमावेशक स्क्रीनिंग कार्यक्रम 'कोलफिट' सुरु केला आहे. रुग्णांच्या जिवंत राहण्याच्या दरामध्ये सुधारणा व्हावी, उपचारांच्या खर्चात घट व्हावी आणि निदान करण्यात विलंब यासारख्या चिंताजनक समस्या दूर करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'कोलफिट' मध्ये वृद्ध आणि युवक दोघांसाठी देखील सीआरसी स्क्रीनिंग वाढवण्यावर ध्यान केंद्रित करण्यात आले आहे, आजार लवकरात लवकर लक्षात यावा यावर भर देण्यात आला आहे. भारतात सीआरसीचा वय दर दर १,००,००० पुरुषांमागे ७.२ आणि दर १,००,००० महिलांमागे ५.१ आहे, जो खूपच कमी आहे. देशाची लोकसंख्या १ अरबपेक्षा जास्त आहे, त्यामानाने केसेसची संख्या खूप जास्त आहे. त्याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे भारतात गेल्या पाच वर्षांमध्ये या आजाराच्या रुग्णांचा जिवंत राहण्याचा दर ४०% पेक्षा




कमी आहे. धावपळीच्या व ताणतणावाच्या आयुष्यात बदललेली जीवनशैली व आहारातील बदल, व्यायामाचा अभाव, तंबाखू आणि मद्य सेवन, अनियमित झोप, लठ्ठपणा आणि मधुमेह, या सर्व कारणामुळे आतड्याच्या कर्करोगात वाढ होत आहे. वेळीच लक्ष दिले नाही तर हे प्रमाण अजून वाढत जाईल असे वास्तव समोर आले आहे. फायबर कमी आणि प्रोसेस्ड फूड, रेड मीट, जंक फूड यांचे प्रमाण वाढले असल्याने व आहारात भाज्या, फळे, आणि तंतुमय पदार्थ नसल्यामुळे पचनसंस्था कमकुवत होते आहे. त्यामुळे आतड्यांवर ताण येतो. नियमित शारीरिक हालचाल नसल्याने स्थूलता आणि शारीरिक निष्क्रियता आल्याने आतड्यांमध्ये घाण साचून आतड्याचा कर्करोग होण्याचा धोका वाढत आहे.

दिनचर्या व आपली आधुनिक जीवनशैली सुधारत, आहारात भरपूर फायबर, फळे, भाज्या, आणि संपूर्ण धान्यांचा समावेश करावा. व्यायामाची सवय लावावी आणि लठ्ठपणा नियंत्रित ठेवावा. तंबाखू, मद्य आणि जंक फूड टाळावे. वेळच्या वेळी तपासणी करावी. असे डॉ. पुरुषोत्तम वशिष्ठ यांनी 'कर्करोग आतड्याचा' या अपोलो हॉस्पिटल ने आयोजित केलेल्या जनजागृती कार्यक्रमाच्या वेळी सांगितले.

यावेळी डॉ अरूणेश पुनेथा, डॉ अनिल डिक्रुझ, डॉ. दीपक कुमार गुप्ता, राजेश शिंदे उपस्थित होते. अपोलो कॅन्सर सेंटर्सच्या 'कोलफिट' कार्यक्रमामध्ये फेकल इम्युनोकेमिकल टेस्टचा समावेश आहे. सीआरसी समजून येण्यासाठी या अभूतपूर्व दृष्टिकोनाचा वापर करण्यात आला आहे. हे एक नॉन-इन्वेसिव, अतिशय अचूक स्क्रीनिंग टूल आहे, ज्यामध्ये मलातील रक्त समजून येते, जे सीआरसीचे संभाव्य प्रारंभिक संकेतक आहे. FIT साठी फक्त एकाच नमुन्याची आवश्यकता असते. FIT उच्च संवेदनशीलता प्रदान करते आणि आहारावर प्रतिबंध घालण्याची गरज नसते. हा एक सुविधाजनक आणि रुग्णांसाठी अनुकूल पर्याय आहे. डॉ पुरुषोत्तम वशिष्ठ, सिनियर कन्सल्टन्ट गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी सांगितले,"आपल्याला कोलोरेक्टल कॅन्सरसाठी रीऍक्टिव्ह केयरऐवजी प्रोऍक्टिव्ह स्क्रीनिंगकडे गेले पाहिजे. अयोग्य आहार, बैठी जीवनशैली आणि स्थूलपणा यासारख्या जीवनशैलीमध्ये उद्भवणाऱ्या कारणांमुळे सीआरसीच्या केसेस वाढत आहेत. जास्त फायबर असलेला आहार, नियमित व्यायाम आणि लक्षणांची वाट न पाहता, स्वतःहून तपासण्या करून घेणे या गोष्टी आजार रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. कोलफिटसह आम्ही FIT च्या माध्यमातून आजार लवकरात लवकर लक्षात येणे सोपे बनवत आहोत, एक सोपे, नॉन-इन्वेसिव परीक्षण गुंतागुंत कमी करू शकते आणि परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणू शकते." डॉ राजेश शिंदे, कन्सल्टन्ट एचपीबी, जीआय, थोरॅसिक ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक सर्जरी, अपोलो कॅन्सर सेंटर्स मुंबई यांनी सांगितले,"कोलोरेक्टल कॅन्सर भारतामध्ये युवक आणि वयस्क दोघांमध्ये देखील वेगाने पसरत आहे, तरी देखील उशिरा निदान करण्यात येत असल्याने या रुग्णांचा जिवंत राहण्याचा दर खूप कमी आहे ही चिंतेची बाब आहे. जिथे स्क्रीनिंग कार्यक्रम चालवले जातात अशा देशांमध्ये अधिक चांगले परिणाम दिसून आले आहेत, जवळपास ५०% सीआरसी केसेस खूप पुढच्या टप्प्यांमध्ये लक्षात येतात, अजून २०% केसेस मेटास्टेसिससह समोर येतात. (लिंक) हा ट्रेंड उलटवण्यासाठी लवकरात लवकर परीक्षण आणि जागरुकता महत्त्वाची आहे. अपोलो कॅन्सर सेंटर्समध्ये आम्ही रुग्णांना मिळणारे परिणाम अधिक चांगले व्हावेत आणि भारतभर सीआरसीचे ओझे कमी करण्यासाठी कोलफिट, अचूक उपचार आणि सर्वसमावेशक देखभालीच्या माध्यमातून आजार लवकरात लवकर बरा व्हावा यासाठी प्रयत्नशील आहोत."

# गरोदर माकडीणीच्या मृत्यूप्रकरणी चौकशीचे आदेश – दोषींवर कठोर कारवाई होईल: उपवनसंरक्षक धनंजय वायभासे

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**यवतमाळ,26 मार्च** – वनभवन येथे काल 25 मार्च (मंगळवार) रोजी झालेल्या महत्वपूर्ण बैठकीत गरोदर माकडीणीच्या मृत्यूप्रकरणी वनविभागाच्या बेजबाबदार कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, सहायक उपवनसंरक्षक निलेश सोनवणे, राऊंड ऑफिसर प्रमोद पवार व मोहिते यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलक कृषी तथा वन्यजीव अभ्यासक प्रा. पंढरी पाठे आणि शिष्टमंडळातील



कॉम्रेड सचिन मनवर, शुभम तेलगोटे,अजित गजभिये यांनी वनविभागाच्या निष्क्रियतेविरोधात जोरदार भूमिका मांडली. उपवनसंरक्षक धनंजय वायभासे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले.तसेच,गरोदर माकडीणीच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर अमर सिडाम आणि संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाईसंदर्भात तपास करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. "चौकशीअंती दोषींवर कठोर कारवाई केली जाईल," असा ठाम इशारा वायभासे यांनी दिला. या निर्णयामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

> "गरोदर माकडीणीच्या मृत्यूप्रकरणी वनविभाग अत्यंत गंभीर आहे. या घटनेची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांची निष्काळजीपणा आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल.वन्यजीव संवर्धन आणि त्यांचे संरक्षण ही आमची प्राथमिकता असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील."
> – **धनंजय वायभासे,(उपवनसंरक्षक,यवतमाळ)**

> "गरोदर माकडीणीचा मृत्यू ही केवळ दुर्दैवी घटना नाही,तर वनविभागाच्या निष्काळजी कारभाराचे ज्वलंत उदाहरण आहे.वन्यजीव संरक्षणाची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे निष्पाप प्राण्यांचे जीव जात आहेत. आम्ही या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाईची मागणी करतो आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात,यासाठी आमचा लढा सुरूच राहील."
> – **प्रा.पंढरी पाठे,(कृषी व वन्यजीव अभ्यासक)**

# आसुडगाव मध्ये खराब रस्ते व अस्वच्छ गटारे यामुळे नागरीक त्रस्त

## रस्ते डांबरीकरणाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेमधील आसुडगाव परिसरात रस्त्याचे डांबरीकरण नसल्याने खराब रस्त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत गेली पंधरा वर्षे या परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण झाले नाही या परिसरातील नागरीकरण सध्या झपाट्याने वाढत आहे त्यामुळे वाहनांची संख्या देखील खूप वाढली आहे पूर्वी जिल्हा परिषद असणारे आसूड गाव आता पनवेल महापालिकेमध्ये येत आहे परंतु गेली आठ-दहा वर्ष पनवेल महापालिका या परिसरातील समस्या कडे दुर्लक्ष करत आहे येथील नागरीकरण वाढल्याने या परिसरात



सध्या चांगले रस्ते चांगली गटारे गार्डन या सर्वच गोष्टीची आवश्यकता भासत आहे परंतु आता लोकप्रतिनिधी नसल्याने या परिसरात समाजकारण करणारे पुढारी व विविध राजकीय पक्षाचे अध्यक्ष यांचा येथील कामासाठी पाठपुरावा करण्यासाठी हाथ आखडता होत आहे असेच दिसते नवीन पनवेल मध्ये सध्या डांबरीकरण जोरात सुरू आहे परंतु महापालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या 27 गावांपैकी अनेक गावात सध्या विविध समस्या तशाच पडून आहेत महापालिका तिकडे दुर्लक्ष करत असल्याने या परिसरातील नागरिक त्रस्त आहेत आता या कामाची जबाबदारी कोण घेणार याकडे येथील नागरिक वाट बघून आहेत


**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द • ख • ल

## पारडगाव येथील सन 2024 मध्ये अतिवृष्टीझालेल्या फळबाग अनुदान बोगस यादीची चौकशी करावी.....अनिल सातपुते

**दैनिक युवक आधार**
**(मराठवाडा प्रतिनिधी):- रमेश सुरशे**



घनसावंगी तालुक्यातील पारडगांव येथील सन 2024 मध्ये अतिवृष्टी झालेल्या फळबाग अनुदान यादी कृषी सहाय्यक शिंदे यांनी बोगस लाभार्थ्याची यादी तयार केली असून ज्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये फळबाग नसून त्यांची नावे अतिवृष्टी अनुदान यादीत टाकण्यात आले आहे.या विषयी घनसावंगी तालुका कृषी अधिकारी यांना अनिल सातपुते यांनी तक्रार दिली आहे. जोपर्यंत पूर्ण चौकशी होत नाही तोपर्यंत शिंदे याची बदली करण्यात येऊ नये. कृषी सहाय्यक यांनी पूर्णपणे बोगस फळबागाची यादी तयार केली असून जे खरे लाभार्थी आहे त्यांना लाभा पासुन वंचित ठेवण्यात येत आहे, ज्यांच्या शेतामध्ये फळबाग लावलेले आहे अशी लोकांची नावे यादीमध्ये आले नसून. ज्या लाभार्थ्यांनी फळबाग शेतामध्ये लावलेच नाही अशीच लोकांची अतिवृष्टी 2024 च्या अनुदान यादी मध्ये नाव आले आहे.याची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी अन्यथा तालुका कृषी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा अनिल गणेश सातपुते यांनी दिला आहे.

## येरोळ परिसरात गव्हु करडी काढणीसाठी हार्व्हेष्टरला पसंती

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ :**



तालुक्यातील येरोळ गावासह सुमठाना, चामरगा, कारेवाडी, धामणगाव, नागेवाडी, बोळेगाव, पांढरवाडी आदी गावात मोठ्या प्रमाणात गव्हु व करडीची पेरणी केली आहेत. सध्या या भागात कडक ऊन्ह लागत असल्यामुळे मजुर टंचाई जानवत आहे. त्यामूळे शेतकऱ्यांनी हार्व्हेष्टरला अधिक पसंती दिली आहे. करडी काढण्यासाठी हार्व्हेष्टरचा अधिक वापर केला जात असुन एक्करी १६०० ते २००० हजार रुपये या दरा प्रमाणे करडीची हार्व्हेष्टरद्वारे राशी केल्या जात आहेत. तर गव्हु एक्करी २५०० ते ३००० हजार रुपये प्रमाणे राशी करुन देण्यात येत असल्याचे हार्व्हेष्टर मालक प्रमोद पाटील यांनी सांगितले.

**शेतकऱ्यामध्ये नैराश!!**

मार्च महिण्यात बॅकेच आडीट असल्यामूळे शेतकऱ्यावर बॅक कर्जाचे मोठे ओझे असते. मात्र बाजारात तयार माल घेवून जाण्यापुर्वीच गव्हु, करडी व ज्वारीचे भाव कमी होत असल्यामुळे शेतकऱ्यात नैराशाचे वातावरण निर्माण झाले आहे. सत्तेत आलेले सरकार निवडणुक पुर्व सर्व शेतकऱ्याचे कर्ज माफ करण्यात येईल असे जाहीर केले होते त्यामूळे शेतकरी कर्ज माफ होईल म्हणुन बसले होते परंतु बॅक कर्मचारी कर्ज भरा म्हणुन नोटीस बजावत असल्याने शेतकरी आर्थीक कोंडीत सापडला आहे.

## सिल्लोड तालुक्यातील बनकीन्होळा येथे संकरित व देशी जनावरांचे तालुकास्तरीय भव्य पशुप्रदर्शनाचे शुक्रवार रोजी आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर व पंचायत समिती सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक 28 रोजी बनकीन्होळा ता. सिल्लोड येथे संकरित व देशी जनावरांचे तालुकास्तरीय भव्य पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आ.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित ( भाप्रसे ) असणार आहेत. तर प्रदर्शनास पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सह आयुक्त गणेश देशपांडे , जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिरसे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विजय फुन्से आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्रदर्शनात सहभागी झालेल्या पशुधनाचे साधारणपणे 9 जातीनिहाय गटाची विभागणी केली जाणार असून विभागणी केलेल्या प्रत्येक गटाला प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवड समिती मार्फत काढून बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. शुक्रवार ( दि.28 ) रोजी सकाळी 8 ते दुपारी 12 पर्यंत सदरील प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व पशुपालकांनी आपली सर्वोत्कृष्ट जनावरे प्रदर्शनात घेऊन यावीत व कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## निधन वार्ता

**ओंकार पाटील**



**श्रीरामपूर (प्रतिनिधी) -** महाराष्ट्र बँकेचे माजी शाखाधिकारी,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ओंकार खंडेराव पाटील यांचे गुरुवार २० मार्च रोजी रात्री अकरा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.ते ७६ वर्षांचे होते.समता पार्टीच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा,ज्येष्ठ समाजसेविका,मुशायरा कमेटीच्या संस्थापक सदस्या रंजनाताई पाटील यांचे ते पती होते. त्यांचे मागे पत्नी,दोन मुली व इतर नातेवाईक असा परिवार आहे.

# मोकाट श्वानांचा बंदोबस्त करा ए आय एम आय एमची मागणी

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजी नगर**
**वार्ताहर**

शहरातील बऱ्याच वसाहतीमध्ये आणि मुख्य रस्त्यावर मोकाट श्वानांचा सुळसुळाट पाहावयास मिळत आहे ही मोकाट फिरणारी श्वानं झुंड बनवून फिरत असतात त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे शहरांमध्ये काही वर्षांपूर्वी अशाच मोकाट श्वानांनी लहान मुलांना चावा घेतल्याच्या घटना घडल्या होत्या रात्रीच्या वेळी खास करून मुख्य रस्त्यावर श्वानांचे झुंडचे झुंड पहावयास मिळतात वयोवृद्ध, महिला आणि लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून लवकरात लवकर या श्वानांचा बंदोबस्त करावा असे निवेदन ऑल इंडिया मजलीस ए इत्तेहादुल मुस्लिमीन महिला व युवकांतर्फे देण्यात आले आहे



वाहनधारकांना त्रास

रस्त्यावर वाहनधारकांना जात असताना हे श्वान पाठलाग करतात या श्वानाने चावा घेऊ नये या भीतीने वाहनधारक सुसाट वेगाने वाहन चालवतात व भीतीमुळे घसरून पडण्याचे प्रकार घडत आहेत त्यामुळे अपघात होऊन वाहनधारकांना इजा होत आहे वेळीच उपाययोजना करून वाहनधारकांना होणारा त्रास दूर करावा असे नागरिकांतर्फे मागणी होत आहे

**महिला व लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण***

शहरातील विविध परिसरामध्ये आणि मुख्य रस्त्यावर श्वानांचे झुंड असतात त्यामुळे घराबाहेर पडण्यासाठी देखील महिला व लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे महिलांना बाजारपेठेमध्ये जाण्यासाठी सोबत कोणी असेल तरच निघण्याची वेळ आली असून ही मोकाट श्वान अंगावर धावून येतात लहान मुलांना खेळताना देखील भुंकतात त्यामुळे लहान मुलं घाबरत आहेत

**मुख्य उद्यान अधीक्षक यांना निवेदन सादर**

शहरातील सिद्धार्थ उद्यानांमध्ये मुख्य उद्यान अधीक्षक यांना एआयएमआयएम शिष्टमंडळाने दिनांक 26 बुधवार रोजी निवेदन सादर करत त्वरित मोकाट श्वानांचा बंदोबस्त करा अशी मागणी केली

**त्वरित कारवाई करणार मुख्य उद्यान अधीक्षक**

ए आय एम आय एम ने निवेदन सादर केल्यानंतर संपूर्ण मुद्द्यावर मुख्य उद्यान अधीक्षकांशी चर्चा केल्यानंतर या गंभीर विषयाकडे जातीने लक्ष घालून त्वरित कार्यवाही करणार असल्याचे मुख्य उद्यान अधीक्षक श्री विजय पाटील यांनी सांगितले श्वान पकडणारे एक अतिरिक्त वाहन देखील वाढवणार असून कर्मचाऱ्यांच्या फेऱ्या आणि वेळ वाढवून ज्या ठिकाणी अशा तक्रारी आहेत त्या ठिकाणी लवकरच अडचणी सोडवल्या जातील असेही श्री पाटील यांनी आश्वासित केले

**हे पदाधिकारी होते उपस्थित**

ए आय एम आय एम सिस्टमंडळामध्ये मा. नगरसेवक अबुल हसन हाश्मी, मा. युवा जिल्हा कार्याध्यक्ष जावेद खान, मा. महिला शहर कार्याध्यक्ष अंकिता गजहास, मा. युवा जिल्हा महासचिव शेख कलीम, सय्यद युसुफ, वसीम सिद्दिकी, पुष्कर आहेरकर, शेख मोहसीन, रफीक पटेल आदी उपस्थित होते

# जंगलात लाल रंगाची उधळण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : राजेंद्र टोपले ,**
**वांगण सुळे , सुरगाणा**



आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात जंगल क्षेत्र आहे. पानझडी ,सदाहरित वृक्षांनी व झाडावेलींच्या घनदाट अशा सावलीने हा दऱ्याखोऱ्याचा डोंगराळ भाग आजही बहरून निघत आहे. जंगलात साग, सादडा,शिसव, उंबर,मोह, कोडई, सावर, हेद, धामोड, शिवन, कळंब, पंगारा हे वृक्ष प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामध्ये ' पंगारा ' हा काटेरी पानझडी वृक्ष डोंगराळ भागात तर कुठे पडीक माळरानावर आजही मोठ्या प्रमाणावर आहे.

रानी फुलला पंगारा
लाली त्यांच्या गालावरी
सुख नाचते नाचते
उजाड त्या माळावरी

जंगलातील झाडांची पानगळ झाल्यावर हे झाड अगदी खराट्याप्रमाणे उघडी बोडकी दिसतात. अशाच विस्तीर्ण वातावरणात वसंत ऋतूत पंगारा मात्र लाल रंगाच्या फुलांनी बहरून गेलेला दिसतो. झाडाच्या बुंध्यापासून तर शेंड्यापर्यंत लहान लहान काटे असणारा हा वृक्ष जंगलातील रान देखाव्याप्रमाणे लाल रंगाच्या दिव्यासारखा ज्योतीने उष्ण तापमानातील गर्मीतही पेटून उठल्यासारखा भासतो.

अंबराला पाहुनी रे
तो खळाळूनी हसतो
मुक्त उधळतो फुले
मोर होऊनी नाचतो

पर्णसंभार नसतांना येणारी लाल रंगाची फुले मिरवणारा उघडा बोडका पंगारा एखाद्या उघड्या अंगाच्या, कपाळावर लाल मळवट भरलेल्या पोतराज सारखा वाटतो. ही लाल फुले फुलपाखरे, पक्षी, भुंगे व इतर कीटक यांना आपल्या फुलामधील असलेल्या मधामुळे आकर्षित करत असतो.

पंगाऱ्याचा प्रवास तसा हा निसर्गातच होत असतो. पक्षी, भुंगे फुलातील मध घेतांना परागीकरण करत असतात. त्यातून धरलेल्या शेंगांमधील बी पडूनही रोपे तयार होतात.

त्यांचे लावण्य बघुनी
वनराणी ती लाजते
सृष्टी निर्मात्याजवळ
हात त्याचारे मागते

फुलांना गंध नसला तरीही आपल्या मनाला त्यांचा रंग हा मोहिनी घालतो. फुलांचा लाल रंग आणि मखमली असणाऱ्या पाकळ्या कोणालाही आपल्याकडे पाहायला लावतात.

' पंगारा ' हा वृक्ष बहुउपयोगी असून त्याच्या फळ्या बनवून बांधकामासाठी वापरतात व सालीपासून धागा काढून त्याचा दोर बनवतात.

अशा पध्दतीने ' पंगारा ' हा वृक्ष अत्यंत महत्त्वाचा वृक्ष आहे.

# आता अंगणवाडी सेविका येणार तुमच्या घरी कार आहे का पाहणार.

**बोगस लाडक्या बहिणींची नावे आता फलकावर येणार.**

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे कुटुंबातील त्यांची निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माजी लाडकी बहिणी योजना सुरू करण्यास महाराष्ट्र शासनाने २८ जून २०२४ रोजी मान्यता दिली .या योजनेमार्फत महाराष्ट्रातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिना रुपये पंधराशे असा आर्थिक लाभ डीबीटी द्वारे देण्यात येणार असे जाहीर केले. आणि इलेक्शनच्या अगोदर ही योजना सुरूही झाली. पण आता या योजनेत एक ट्विस्ट आला आहे.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या घरी कार आहे का अथवा नाही याची तपासणी लवकरच जिल्ह्यात सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने आरटीओ कडून अंगणवाडी सेविकांना लाडक्या बहिणीची यादी दिली आहे. कुटुंबातील एका व्यक्तीकडे कार असलेल्या महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे. शासनाने कार असलेल्या लाभार्थ्यांना स्व इच्छेने हा लाभ सोडावा असे आव्हान केले होते. मात्र यासाठी




कमी प्रतीसाद मिळाल्याने आता प्रत्यक्ष लाडक्या बहिणीच्या घरी जाऊन अंगणवाडी सेविकांकडून तपासणी करण्यात येणार आहे. पाच एकर शेती, शासकीय नोकरी नको, याशिवाय यामध्ये अडीच लाख अशी उत्पन्नाची अट होती. पण आता या अटींची अंमलबजावणी न करणाऱ्या बहिणींची नावे कमी करण्यात येणार आहेत. तसेच ज्या बहिणींच्या नावावर चार चाकी असलेल्यांची नावेही हटविण्यात येणार आहेत. या योजनेचा शासनाने लाभ देताना महिलांकडून हमीपत्र भरून घेतले आहे .यामध्ये चार चाकी नसल्याचे नमूद केल्याने त्यांना लाभ दिला होता, मात्र आता या अर्जांची प्रत्यक्ष छाननी होणार ज्यांच्या नावावर कार असणार त्यांची नावे आता कमी करण्यात येणार आहेत.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची भेट

**दैनिक युवक आधार सहसंपादक**
**मुकुंद कांबळे**

दलित आदिवासींचा राखीव निधी अन्यत्र वर्ग करू नये;
सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार पोलिसांवर कारवाई करावी ; आदी मागण्यांसाठी केली राज्यपालांशी चर्चा



मुंबई दि. 24 - महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी विविध मागण्यांसाठी भेट घेतली. महाराष्ट्राच्या विविध विषयांवर चर्चा केली. अनुसुचित जाती/जमातीसाठी राखीव असणारा निधी अन्य खात्यामध्ये वर्ग करण्यात येवू नये. याबाबत आग्रही मागणी केली. राईट टू एज्युकेशन या कायद्याअंतर्गत 1 ले 8 वी पर्यंतचे शिक्षण मोफत असुन त्यामध्ये वाढ करुन 9 वी आणि 10 वी चे वर्ग सुध्दा राईट टु एज्युकेशन कायद्याअंतर्गत समाविष्ट करण्यात यावेत. त्यामुळे 1 ले 10 पर्यंत राईट टु एज्युकेशनच्या माध्यमातुन गरिबांना मोफत शिक्षण राहील. यासाठी राज्यपालांनी हे प्रयत्न करावेत. अशी आग्रही मागणी ना. रामदास आठवले यांनी यावेळी केली. परभणी येथील भीमसैनिक शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार पोलिसांवर कारवाई करावी अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली आहे.

ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात राज्यपालांना भेटलेल्या शिष्टमंडळात रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ कासारे युवक आघाडी महाराष्ट्राचे अध्यक्ष पप्पु कागदे, एड. बी.के. बर्वे, वामन आचार्य ; रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे, घनश्याम चिरणकर आदि मान्यवर उपस्थित होते.

**सदर भेटीमध्ये ना. रामदास आठवले यांनी विविध मागण्या केल्या आहेत.**

1) छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा लढाऊ इतिहास जतन करण्यासाठी पुरातत्व खाते तसेच केंद्र व राज्य शासन प्रयत्न करीत असते. अशी अनेक ठिकाणे आहेत त्या ठिकाणी विविध झालेल्या लढाया व त्या ठिकाणी विजय संपादन करुन शत्रुचा खात्मा केलेला इतिहास सुध्दा जतन केलेला आहे. तरी संभाजीनगर येथे असलेली औरंगजेबाची कबर हा सुध्दा एक इतिहासाचा भाग आहे. तरी संभाजीनगर येथे असलेली औरंगजेबाची कबर उखडणे योग्य नाही.

2) महापुरुषांच्या अवमानाबद्दल तसेच नागपूर व महाराष्ट्रातील इतर भागांमध्ये दंगल सदृश्य परिस्थिती उद्भवत आहे. सदर अनुषंगाने महाराष्ट्रात शांतता राहावी या संदर्भात शासनाने प्रयत्न करावेत.

3) पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली असून सदर एतिहासिक व महत्वपूर्ण संस्थेला काही समस्या भेडसावत आहेत. उदा. इमारतींची दुरुस्ती करणे, नविन इमारतीचे बांधकाम करणे यांसारख्या विविध कामांसाठी शासनाने 500 कोटींची तरतुद करण्यात यावी.

4) परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीवर समाजकंटक दत्ता सोपान पवार या समाजकंटकाने हल्ला केल्यानंतर उद्भवलेल्या आंदोलनामध्ये पोलिसांकडुन कार्यवाही दरम्यान सोमनाथ सुर्यवंशी या दलित युवकाचा मृत्यु पोलिस मारहाणीत झाला. तरी सदर हत्येस जबाबदार असणा-या पोलिस कर्मचारी यांना सेवेतुन कायमस्वरुपी बडतर्फ करुन त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. तसेच समाजकंटक दत्ता सोपान पवार यांची नार्को टेस्ट करुन त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन परभणी आंदोलन कर्त्यांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे.

5) भूमिहीन शेतकरी, शेजमजुरांना उपजिवीकेसाठी पाच एकर जमीन देण्यात यावी.

6) खाजगी क्षेत्र वाढत असून सरकारी क्षेत्रातील नोक-यांच्या संधी कमी होत असल्याने खाजगी क्षेत्रात आरक्षण धोरण लागू करावे.

7) अनुसूचित जाती/जमाती व इतर मागासवर्गीय समुदायासाठी असणा-या बजेटची योग्य अंमलबजावणी करावी तसेच अखर्चीत निधी व तरतुद केलेला निधी इतर विभागांच्या योजनांसाठी वळवु नये.

8) महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती/जमाती यांच्यावरील अन्याय/ अत्याचार संदर्भात तात्काळ कार्यवाही करावी. तसेच अनूसुचीत जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच महिला व बालके यांच्यावर होणारे अन्याय/अत्याचार कमी करण्यासाठी कठोर कार्यवाही करावी.

9) झोपडपट्टी पुनर्वसवन योजनेची अंमलबजावणी करुन पुढील दहा वर्षात झोपडपट्टी मुक्त राज्य करण्यासाठी प्रयत्न करावे. 450 फुटांचे घर देण्यात यावे. सद्या 300 फुटाचे घर दिले जाते.

10) गायरान जमिनी नियमाकुल करण्यासंदर्भात सन 1990 चा शासन निर्णय लागू असून सदर अतिक्रमणे नियमाकुल करण्यासाठी त्यामध्ये सन 2020 पर्यंत मुदतवाढ करुन गायरान जमिनी नियमाकुल कराव्यात.

येणे प्रमाणे ना. रामदास आठवले यांनी त्यांच्या मागण्या राज्यपाल भेटीदरम्यान केल्या आहेत.

**हेमंत रणपिसे**
**प्रसिद्धी प्रमुख**

# यवतमाळ जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या निष्क्रियतेविरोधात शिक्षकांचा एल्गार – 1 एप्रिलपासून बेमुदत साखळी उपोषण

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**



जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या मनमानी आणि प्रलंबित मागण्यांकडे होत असलेल्या दुर्लक्षाविरोधात शिक्षकांनी पुन्हा एल्गार पुकारला आहे. विषय शिक्षक वेतनश्रेणीतील त्रुटी, विस्तार अधिकारी पदोन्नती आणि इतर न्याय्य मागण्यांसाठी 1 एप्रिल 2025 पासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषण करण्यात येणार आहे.

20 जानेवारी 2025 रोजी महाराष्ट्र राज्य पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना जिल्हा शाखा यवतमाळ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या निष्क्रियतेविरोधात धरणे आंदोलन करण्यात आले होते.आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या मध्यस्थीने शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा यांनी 10 फेब्रुवारीपर्यंत मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, दोन महिने उलटूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने शिक्षक संघटनांनी पुन्हा संघर्षाचा मार्ग स्वीकारला आहे.

**प्रमुख मागण्या:**

विषय शिक्षक वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करून सुधारित आदेश काढावेत.

उर्दू माध्यमाच्या विषय शिक्षकांचे वेतनश्रेणीचे आदेश त्वरित लागू करावेत.

विस्तार अधिकारी पदोन्नतीसाठी समुपदेशन प्रक्रिया राबवावी.

केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी शासन निर्णयानुसार 29 मार्चपूर्वी यादी प्रसिद्ध करावी.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच उच्च श्रेणी मुख्याध्यापकांसाठी तात्पुरत्या याद्या जाहीर कराव्यात.

शिक्षक संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, 29 मार्चपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास 1 एप्रिलपासून आदेश मिळेपर्यंत बेमुदत साखळी उपोषण करण्यात येईल. यासंबंधीच्या नोटिसा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना देण्यात आल्या आहेत.

**जिल्हाध्यक्ष महेंद्र वेरुळकर यांचा इशारा---**

"जिल्हा परिषद प्रशासनाची सकारात्मक भूमिका असती, तर विषय शिक्षक वेतनश्रेणीतील त्रुटी आणि विस्तार अधिकारी पदोन्नती दोन दिवसांत निकाली निघाली असती. मागील आंदोलनात आम्ही दोन महिने वेळ दिला – ही आमची चूक झाली. मात्र, आता शिक्षकांच्या हक्कांसाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढू. 29 मार्चपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास हे आंदोलन अटळ आहे आणि संपूर्ण जिल्ह्यातील शिक्षक या लढ्यात उतरतील."

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र वेरुळकर,शिक्षक सेनेचे अध्यक्ष प्रकाश सालपे, उर्दू शिक्षक संघटनेचे कार्याध्यक्ष मो. रफिक, उच्च शिक्षित संघटनेचे अध्यक्ष निळकंठ कुलसंगे, पदवीधर संघटनेचे राजेश जुनघरे, अरुण महल्ले, रवींद्र बोबडे, महेश खोडके यांच्यासह अनेक शिक्षक उपस्थित होते.

# "पॉवरलिफ्टिंग खेळाडू विक्रमसिंह अधिकारी यांना स्पर्धेत यश"

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**

शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित पॅरा पॉवर लिफ्टिंग खेळाडू आणि नेरूळ नवी मुंबई येथील रहिवाशी विक्रमसिंह अधिकारी यांनी दोन पदके प्राप्त केली आहेत.त्यांनी राष्ट्रीय स्तरावर ब्राँझ पदक आणि खेळो इंडिया स्पर्धेत सहभागी होऊन ब्राँझ पदक जिंकले.

महत्वाचे स्पर्धेत त्यांनी पदक परंपरा कायम राखली याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. नियमित सराव आणि जिद्द,योग्य प्रशिक्षण यामुळे आपण यशस्वी होतो असे त्यांचे मत आहे. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी. प्रशिक्षक राकेश पाटील यांना दिले खेलो इंडिया स्पर्धा दिल्ली येथे आयोजित केली आहे. वल्कन हेल्थ क्लब, नेरुळ, नवी मुंबई येथे नियमित सराव करणाऱ्या या जिद्दी खेळाडूला वेलकन जिमचे क्रीडाप्रेमी मालक व संचालक दयानंद भगत आणि सर्व खेळाडूं सहकारी यांनी या खेळाडूला नेहमीच पाठिंबा आणि प्रोत्साहन दिले आहे. याबद्दल विक्रम सिंह अधिकारी यांनी सर्वांचे खुप खुप आभार मानले आहेत.



## पनवेलमधील 32 ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

रायगड जिल्ह्यात 7 डिसेंबरपासून पुढील 100 दिवसांच्या कालावधीत क्षयरोग दूरीकरण मोहीम राबविण्यात आली. क्षयरोग नियंत्रण विभागाने 100 दिवस केलेल्या कामामुळे तालुक्यातील 32 ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या, तर तालुक्यात केलेल्या 48 हजार क्षयरुग्ण तपासणीमधून अवघे नवीन 17 नवे क्षयरुग्ण आढळले.

पनवेल तालुक्यामध्ये 100 दिवसांमध्ये 48 हजार लोकांची क्षयरोग तपासणी करण्यात आली होती. क्षयरोग नियंत्रण विभागाने 100 दिवस केलेल्या कामामुळे तालुक्यातील 32 ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या, तर तालुक्यात केलेल्या 48 हजार क्षयरुग्ण तपासणीमधून अवघे नवीन 17नवे क्षयरुग्ण आढळले. गेल्या तीन महिन्यांपासून या मोहिमेअंतर्गत विविध स्पर्धा, क्षयरुग्णांना दिल्या

जाणाऱ्या विविध शासकीय योजनांविषयी प्रबोधन व घरोघरी जाऊन क्षयरुण शोधण्याची मोहीम घेण्यात आली. आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या क्षयरोगमुक्ती कार्यक्रमात सर्वांना क्षयरोगमुक्तीची शपथ दिली. निःक्षय आवाहनाद्वारे गावोगावी जाऊन क्षयरोग निदानासह प्रबोधन करण्यात आले. यापूर्वी तीन आठवडे सलग खोकला असेल तर तपासणी केली जात होती. यापुढेही जात दोन आठवडे व क्षयरुग्णांच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींची एक दिवस खोकला असेल तरीही तपासणी केली. 'लवकर निदान व त्वरित उपचार' याप्रमाणे 60 वर्षांवरील व्यक्ती, वसतिगृहे, होस्टेल, कारागृह, औद्योगिक वसाहती, सार्वजनिक ठिकाणे, वीटभट्टी व साखर कारखाने येथे क्षयरुग्ण शोधमोहीम घेतली. यातून गेल्या 100 दिवसांत अवघे 17 नवे रुग्ण वाढल्याने पनवेल तालुक्याची क्षयरोगमुक्तीकडे वाटचाल सुरू झाली आहे.

क्षयरोगमुक्त झालेली गावे

देवळोली, पोसारी, जांभिवली, गुळसुंदे, कराडे खुर्द, सावळे, दिघाटी, तुराडे, केळवणे, नांदगाव, बारवई, सोमाटणे, भातन, चिखले, पोएंजे, शिरवली, मालढुंगी, वाकडी, धुंदरे, उमरोली, खैरवाडी, खानाव, पाले बुद्रुक, नितळस, चिद्रण, गव्हाण नाव्हा, तरघर, ओवळे, पारगाव, वाघिवली, वडघर

## वैश्य एकता दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय वैश्य फेडरेशन रायगड यांच्या वतीने वैश्य एकता दिवस साजरा करण्यात आला. यावेळी सदस्यांनी श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्था संचालित राजाश्रय वृद्धाश्रम रसायनी, मोहोपाडा व सेवागंण वृद्धाश्रम पेण येथे भेट देऊन वयोवृद्धांची चर्चा केली. त्यांच्याबरोबर समन्वय साधत असताना त्यांचे डोळे अक्षरशः पाणावले होते. गिटार वादक प्रितेश चौधरी यांनी सर्वांना गिटार वाजून मंत्रमुग्ध केले. 95 वर्षाच्या आजी सुद्धा गाण्यांवर नाचत होत्या. यावेळी त्यांना ब्लँकेट आणि फळे वाटप करण्यात आले.

भेटी दरम्यान काही वृद्धांनी आपण वृद्ध आहोत व आपल्याला आपल्या कुटुंबापासून वेगळे ठेवलेले आहे या गोष्टीची जाणीव विसरून ते सर्व वृद्ध या कार्यक्रमामध्ये समाविष्ट झाले होते. त्यातील काही वृद्धांनी कविता, गाणी गायली. राजाश्रय वृद्धाश्रम येथील शुभश्री भोईर यांनी सागितले की, अनेक जण वृद्धाश्रमाला भेट देतात आणी निघुन जातात परंतु आपण त्यांना आपलस केलत. तसेच स्नेहांगण वृद्धाश्रम पेण येथील पटवर्धन यांनी सेवा करण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. वैश्य एकता दिवस कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय फेडरेशन रायगड जिल्हा महिला अध्यक्ष हर्षला तांबोळी, आंतरराष्ट्रीय वैश्य फेडरेशन रायगड जिल्हा अध्यक्ष कैलास पोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## राकेश टेमघरे यांची ग्रामसेवक संघटनेच्या तालुका कार्याध्यक्ष पदी नेमणूक

### अभिनंदनाचा होत आहे वर्षाव

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**



ग्रामपंचायतीचे कार्यक्षम ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे भाऊसाहेब यांची रोहा तालुका ग्रामसेवक संघटनेच्या कार्याध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली.त्यांच्या निवडीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तालुका संघटनेची रोहा येथे पंचायत समिती द.ग.तटकरे सभागृहात मंगळवार 25 मार्च रोजी झालेल्या बैठकीत नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. यामध्ये राकेश टेमघरे यांची सर्वानुमते कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल नागोठणे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी रवींद्र राऊत,संतोष जोशी,अमोल ताडकर,दिलीप तेलंगे,विनोद घासे, हरीश शिर्के तसेच ग्रामस्थ ऋषिकेश भोय उपस्थित होते. टेमघरे यांच्या निवडीबद्दल सरपंच सुप्रिया संजय महाडिक व सर्व ग्रामपंचायत सदस्य, सदस्यांसह नागोठणे शहर व विभागातून त्यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# फिरते लोकन्यायालय व कायदेविषयक जनजागृती शिबिर यशस्वीरीत्या संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकाराने न्याय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी फिरते लोकन्यायालय आणि कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. 24 मार्च रोजी नेरे येथे फिरते लोकन्यायालय, तर 25 मार्च रोजी ग्रामपंचायत करंजाडे येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर पार पडले. या उपक्रमाचा शुभारंभ पनवेल अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रवेशद्वारातून सर्व न्यायाधीशांच्या उपस्थितीत, फिरत्या लोकन्यायालयाला ग्रीन सिग्नल देऊन करण्यात आला. या दोन्ही कार्यक्रमांमध्ये



निवृत्त न्यायाधीश श्रीकांत उपाध्ये यांची फिरत्या लोकन्यायालयासाठी विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या अनुभवाच्या जोरावर अनेक प्रकरणे निकाली लागली तसेच नागरिकांना न्याय व कायद्याबाबत मोलाचे मार्गदर्शन मिळाले. राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून आयोजित या उपक्रमात न्यायालयीन प्रक्रियांबद्दल जनजागृती, तडजोड योग्य प्रकरणांची सोडवणूक आणि कायद्याविषयी मार्गदर्शन यावर भर देण्यात आला. न्यायाधीश श्रीकांत उपाध्ये यांच्या नेतृत्वाखाली फिरत्या लोकन्यायालयाने अनेक प्रकरणे निकाली काढली, तर कायदेविषयक शिबिराद्वारे नागरिकांना कायद्याच्या महत्त्वाच्या बाबी समजावून सांगण्यात आल्या. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेरे ग्रामपंचायत आणि करंजाडे ग्रामपंचायतच्या सरपंच, ग्रामसेवक आणि इतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवता आला आणि शेकडो नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळू शकला. याशिवाय, अड. इंद्रजीत भोसले, अड. स्वाती सोनवणे, अड. सुयश कामेरकर, अड. विकी दुसिंग, अड. मनीषा गायकर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर आणि विधी स्वयंसेवक शैलेश कोंडसकर यांनीही या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारामुळे आणि स्थानिक ग्रामपंचायतींच्या सहकार्यामुळे न्याय गावागावांपर्यंत पोहोचला असून, कायदेशीर प्रक्रियांविषयीची जनजागृती प्रभावीपणे झाली आहे. न्यायाधीश उपाध्ये यांचे मार्गदर्शन आणि संपूर्ण न्यायिक, विधी व स्वयंसेवी टीमच्या प्रयत्नांमुळेच हा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

## देवगाव येथे शांतता समिती बैठक

### सोशल मीडिया माध्यमांचा उपयोग समाज घडवण्यासाठी करावा - सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**
**देवगाव : ता.२६**



सध्याच्या डिजिटल युगात सोशल मिडीया हे संवादाचे प्रभावी माध्यम बनले आहे. मात्र, या माध्यमाचा उपयोग समाज घडवण्यासाठी झाला पाहिजे. बऱ्याचदा अफवा, खोट्या बातम्या किंवा द्वेषपूर्ण पोस्ट्सद्वारे दोन जाती, धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. असे कृत्य करणाऱ्यांवर पोलिसांची नजर राहणार असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील. समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था, जातीय सलोखा कायम राखण्याकरिता प्रत्येकाने स्वतःच्या जबाबदारीचे भान ठेवत सहकार्य करण्याचे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी केले. ते आगामी रमजान ईद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, अक्षय तृतीया निमित्ताने लासलगाव पोलिस ठाण्याच्या वतीने देवगाव येथे घेण्यात आलेल्या शांतता समितीच्या बैठकीत बोलत होते. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य भाऊसाहेब बोचरे, माजी सरपंच विनोद जोशी, उपसरपंच लहानु मेमाणे, जयेश लोहारकर, राजेंद्र मेमाणे, राजेंद्र कांबळे, दादाभाई काद्री यांनी मनोगत व्यक्त केले. प्रसंगी सरपंच वैशाली आढागळे, मौलाना आलीम इनामदार, भास्कर बोचरे, पोलीस हवालदार औदुंबर मुरडणर, पोलीस पाटील सुनील बोचरे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष गोपीनाथ बोचरे, मनोहर बोचरे, प्रमोद तुपे, संपतराव आढागळे, जावेद शेख, भूषण पगारे, भारती अढागळे, रेश्मा काद्री, दिगंबर सोमवंशी, विलास शिंदे, शामराव लोहारकर, रेवणसिद्ध लोहारकर, संतोष हुजबंद, योगेश कुलथे, राजेंद्र बोचरे, उमर काद्री आदींसह बुद्ध विहार समिती, मुस्लिम समाज व मराठा बांधव, ग्रामस्थ उपस्थित होते.

## पशु वैद्यकिय दवाखाण्यात डॉक्टर नसल्याने आजारी जनावरांची हेळसांड

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**



**शिरूरआनंतपाळ :** तालुक्यातील येरोळ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील डॉक्टर अनेकदा गैरहजर असतात. यामुळे उपचारासाठी आणलेल्या जनावरांची हेळसांड होते. डॉक्टर नसल्याने उपचाराची भिस्त शिपायावरच असते. शिरूरआनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील जि.प.लातुर अंर्तगत पशुसंवर्धन विभागांतर्गत असलेल्या पशुवैद्यकीय श्रेणी -२ चा दवाखाना आहे. या दवाखान्यांतर्गत येरोळ गावासह सुमठाना, डिगोळ, जांभळवाडी, कारेवाडी, पांढरवाडी, दैठना, चामरगा, बोळेगाव, हानमंतवाडी या परिसरातील जनावरांवर उपचार करण्यात येतात. असे असले तरी या गावात लाळ्या, खुरकूत, लसीकरण आदी कामांसाठी डॉक्टर क्वचितच जात असल्याचे दिसून येत आहे. यामुळे पशुपालकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेकदा शेती मशागतीचे काम करीत असताना बैल जखमी होतात. अशा वेळी त्यांना येरोळ येथील दवाखान्यात आणण्यात येते. नेमके यावेळी दवाखान्यात डॉक्टर हजर नसल्याने पशुंवर शिपायांकडून उपचार करून घ्यावे लागतात. अनेकदा जनावरांना गंभीर इजा असल्यास किंवा इतर काही गंभीर आजार असल्यास वेळ प्रसंगी खाजगी डॉक्टरांचीही मदत घ्यावी लागते. यासाठी शेतकऱ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी करण्याची मागणी पशुपालक करत आहेत.

**खाजगी डॉक्टरांकडून करावे लागतात उपचार...**

येरोळ येथील पशु चिकित्सालयात अनेकदा दवाखान्यात डॉक्टर हजर नसल्याने शिपाईच जखमी जनावरावर उपचार करतो उपचार.पशुंना गंभीर इजा असल्यास खाजगी डॉक्टरांची मदत घ्यावी लागत आहे. तसेच जि.प. लातुर कडुन भरपुर औषधसाठा येत असताना खाजगी मेडीकल मधुन औषध आणा अस पशुपालकना सांगत असुन हे डॉक्टर खेड्यात वाडी वस्तीवर जाऊन खाजगी प्राक्टीक्स करत असुन पैशे उकळत आहेत. याची चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी अशी मागणी पशु पालकांनी केली आहे.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये वाचन कोपऱ्याचा जेष्ठ पत्रकार अरुण कुलकर्णी व शहागडकर यांच्या हस्ते शुभारंभ...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी तथा विद्यार्थ्यांना चालू घडामोडींची माहिती व्हावी या हेतूने मुख्याध्यापक श्री.मोरे सर यांच्या कल्पनेतून वाचन कोपरा हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पाटोदा शहरातील ज्येष्ठ पत्रकार तथा जय हिंद टाईपरायटिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य श्री.अरुण कुलकर्णी सर व पाटोदा शहरातील वर्तमानपत्राचे वितरक श्री.रमेशरावजी शहागडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री.बांगर सर यांची उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.मोरे सर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. उगले सर यांनी केले. तर आलेल्या मान्यवरांचे स्वागत श्री.माताडे सर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती शेलार मॅडम यांनी मानले. या उपक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांना दररोजची दैनंदिन वर्तमानपत्र वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या मध्ये दोन विभागीय वर्तमानपत्र व दोन जिल्हास्तरीय वर्तमानपत्र वाचण्यास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या साठी शाळेत भिंतीवर वाचन कोपरे तयार करण्यात आलेले असून त्या वर दैनंदिन वर्तमानपत्र चिटकवले जातील व त्याचे वाचन विद्यार्थी करतील. याच बरोबर आवश्यक असणारी माहिती व दिनविशेष यांची ही कात्रणं त्या ठिकाणी वाचन कोपऱ्यावर वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील असा मानस सर्व शिक्षकांनी व्यक्त केला. शाळेतून हा उपक्रम सुरू करण्यामागचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी तथा त्यांच्या ज्ञानात भर पडावी हे आहे.



# " तब्बल 30 वर्षांनी पुन्हा एकदा भरली शाळा."

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

आपापली सर्व कामे बाजूला ठेवून महात्मा गांधी विद्यालय दिघोडे ता. उरण या विद्यालया च्या सन १९९३ - ९४ च्या १० वी बॅचचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी तब्बल ३० वर्षांनी प्रथमच एकत्र आले. धारु रिसॉर्ट , रानसई येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाला सुरुवात होण्यापूर्वी विद्यालयाचे जे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मयत झाले आहेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सकाळी १० वाजल्यापासून ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांनी आपल्या गुरुजनांसोबत आणि मित्र मैत्रिणी सोबत खूप धमाल करून जुन्या आठवणींना उजाला दिला. शशिकांत ठाकूर (दिघोडे), सचिन वाणी(




दिघोडे), परमानंद पाटील (धुतुम), सज्जन जोशी (टाकी), सौ. मंगला चिर्लेकर (विंधणे), सौ. सुवर्णा गावंड (पिरकोन) यांनी सर्वांशी संपर्क साधल्याने जवळपास ५० विद्यार्थी विद्यार्थिनी जमा झाले होते. सर्व मित्र-मैत्रिणींचा कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी मोलाचा वाटा होता. हे सर्वजण आता वयाच्या ४५ च्या घरातील झाले आहेत. सर्वांनी प्रथम आपला कौटुंबिक आणि वैयक्तिक परिचय करून देऊन आजवर जीवनात आलेले चांगले वाईट प्रसंग सर्वांसमोर व्यक्त केले. या मेळाव्याला विद्यार्थ्यांसोबत त्यांचे गुरुवर्य सेवानिवृत्त प्राचार्य श्री. नाथा नाईक सर, सेवानिवृत्त प्राचार्या सौ. छाया कोल्हे मॅडम, सेवानिवृत्त शिक्षिका सौ. आशा पाटील मॅडम ,सेवानिवृत्त शिक्षक अंकुश नाईक सर ,संजय फल्ले सर, जितेंद्र पिंपरे सर हजर होते. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना आपण संपूर्ण आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे असा मोलाचा संदेश दिला. आपण वर्गातील ज्या बेंचवर बसलो होतो तो बेंच आणि वर्गात शिकवत असताना गुरुजनांनी केलेली शिक्षा अशा विविध प्रसंगातून पूर्ण दिवसभर सर्व विद्यार्थ्यांनी आनंद लुटण्याचा प्रयत्न केला. तब्बल 30 वर्षांनी असं मुक्त व्यासपीठ मिळाल्याने सर्वांनी मनमुराद आनंद घेतला. महेश पाटील यांनी कविता सादर केली. दुपारी जेवण उरकल्यावर सर्व विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्यासोबत गुरुजनांनी प्रसन्न कोळी यांच्या डी.जे.च्या ठेक्यावर ताल धरून कार्यक्रमाची रंगत वाढवण्याचा प्रयत्न केला. " लागो न दृष्ट माझी माझ्याच वैभवाला " या उक्तीला लाजवेल असा हा सोहळा साजरा करून संध्याकाळी ५ वाजता एकमेकांचा निरोप घेऊन डोळे ओले करत साश्रू नयनांनी सर्वांनी आपल्या घरचा रस्ता धरला आणि पुन्हा लवकरच एकत्र येऊ असा आशावाद व्यक्त केला.

# काय कमावले याचा विचार करा

आज सायंकाळी येणारी रमजानची सत्ताविसावी रात्र ही शब ए कद्र म्हणून सर्वत्र पाळण्यात येते.आज रात्री गेले महिनाभर तरावीह मध्ये पठण करण्यात आलेल्या कुरआन पठणाची सांगता होणार आहे.म्हणजे कुरआन शरीफचे वाचन,पठन पूर्ण होणार आहे.ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. गेले महिनाभर प्रत्येकाने तरावीहच्या माध्यमातून कुरआन पठन पूर्ण केले आहे.ते समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.आता प्रत्यक्ष त्याचे आपल्या जीवनात आचरण करण्याची गरज आहे. आपल्या जीवनामध्ये प्रत्येक जण विशिष्ट ध्येयापोटी काही ना काही मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. पद,प्रतिष्ठा,संपत्ती,सेवा यासाठी सतत धडपडत असतो.या सर्व गोष्टी प्राप्त करताना त्यात नशिबाचा देखील मोठा वाटा असतो.नशीब आपल्या हातात नसलं तरी आपल्यासाठी योग्य प्रकारचा निर्णय लावून घेणे हे आपल्या हातात आहे.त्यासाठी सर्वात मोठे हत्यार म्हणजे दुआ मागणे.असं म्हटलं जातं कि दुआ मोमिन का हथियार है.म्हणजे जिथे सर्व मार्ग संपतात,सर्व प्रयत्न अपुरे पडतात, कोणताही वशिला कामी येत नाही,सगळीकडून निराशा हाती येते, त्यावेळी एक प्रभावी हत्यार आपल्याकडे असते,ते म्हणजे दुआ. ज्यावेळी एखादा त्रस्त माणूस अत्यंत वियोगाने सर्व मार्ग बंद झालेले असताना ईश्वराकडे तन्मयतेने दुआ मागतो. त्यावेळी ईश्वर आणि भक्त या दोघांमध्ये कोणीही नसतं.ती दुआ थेट अर्शपर्यंत जाते.ती जर कबूल झाली तर जगातील कोणतीही ताकद तुम्हाला रोखू शकत नाही.म्हणून या दुनियेमध्ये याच्या त्याच्याकडे हात पसरवण्यापेक्षा ईश्वराच्या दरबारामध्ये हात उंच करा,तेथे मागा आणि आपले प्रयत्न सुरू ठेवा.निश्चितपणे आपले इप्सित साध्य होते. दररोजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसाची धावपळ सारखी सुरू असते.तो कधी आराम करीत नाही.सुखाच्या मागे तो धावत असतो. पण हे सर्व करून आपण काय मिळवले याचा तो कधी विचार करीत नाही. एक अपेक्षा पूर्ण झाली की दुसरी अपेक्षा मनात जन्म घेते. मग तिच्या पूर्तीसाठी तो पुन्हा




धावपळ करीत असतो.पण हे सर्व व्यर्थ आहे. जे मिळालं ते आपलं आणि जे मिळेल ते ही आपलं.एवढी माफक अपेक्षा ठेवून जर आपण जीवन बसर केले तर नक्कीच मनाचं समाधान झाल्याशिवाय राहत नाही. रमजान महिन्याचे आता शेवटचे चार दिवस बाकी आहेत. महिनाभर प्रत्येक मुस्लिम घरामध्ये एक वेगळे वातावरण निर्माण झाले आहे.पहाटे सहरी, तीलावत ए कुरआन, नमाज,इफ्तारी अशा पद्धतीने एक धार्मिक वातावरण घराघरातून दिसून येते.हे वातावरण महिनाभरच न राहता वर्षभर कायमस्वरूपी करण्याची आवश्यकता आहे. रमजान महिन्यामध्ये सर्व प्रकारच्या वाईट कृत्य पासून दूर राहण्याचा प्रयत्न प्रत्येक जण करीत असतो.परंतु पूर्ण वर्षभर सर्वांनीच जर या पद्धतीने वागण्याचे ठरवलं तर निश्चितपणे एक चांगला समाज अस्तित्वात येईल.यासाठी समाजातील सर्वच घटकांनी जे जे चांगले आहे ते स्वीकारावे, त्याचा अंगीकार करावा आणि आपले जीवन समृद्ध आणि संपन्न करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.रमजान महिना हा व्यक्तीच्या जीवन प्रशिक्षणाचा काळ म्हणून गणला जातो.या महिन्यात आत्मसात केले जाणारे सर्व गुण पुढील वर्षभर जर आपल्यात टिकून राहिले तर नक्कीच आपण मानसिक,आत्मिक दृष्ट्या देखील सुदृढ राहू शकतो. रमजान महिन्यामध्ये ज्याप्रमाणे आपण एकमेकाला मदत करतो.तीच भावना आज समाजामध्ये सर्वत्र दिसून येत आहे.कोरोना उच्चाटनासाठी सर्व जणांनी मिळून शक्य ते सर्व प्रयत्न केले आहेत. मेडिकल क्षेत्रातील तुरळक गैरप्रकार जर सोडले तर अनेक सेवाभावी संस्था व लोक आपापल्या परीने लोक सेवा करीत आहेत. मानवाच्या निर्मितीचा मूळ उद्देश असा आहे कि सर्वांनी धर्म, जात, पंथ भेद विसरून फक्त मानव आणि मानवता म्हणजे इन्सानियत जोपासण्यासाठी कार्य करण्याची गरज आहे. आमच्या मित्रांचा एक राब्ता ब्लड ग्रुप आहे.यांच्या माध्यमातून वर्षभर ज्या रुग्णाला रक्ताची गरज भासते, ती गरज भागविण्याचे काम या ग्रुपचे सहकारी करीत असतात.यामध्ये कोणत्याही प्रकारचा जातिभेद, धर्मभेद केला जात नाही.सर्वांच्या रक्ताचा रंग लाल आहे आणि तो सर्वांना मॅच होतो. त्यामुळे अशा प्रकारचे उपक्रम करणाऱ्या सर्वच लोकांना आपण सातत्याने सदैव सहकार्य करणे आवश्यक आहे. (क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# महिलांना वेध लागले आगोटीच्या खरेदीचे.



दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी

मार्च महिना संपत आला की महिलांना अगोटीच्या खरेदी चे वेध लागतात. पूर्वी साधारण मार्च नंतर मे अखेरपर्यंत आगोटची लगबग सर्वत्र दिसायची. पावसाळ्यासाठी तरतूद करताना कोकणी माणूस या काळात व्यस्त असे. कोकणात पूर्वीपासून शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने पावसाळ्यात शेतकरी राजा शेतीच्या कामांमध्ये गुंतून जातो आणि त्या वेळेला शेतकऱ्यास अजिबात वेळ नसतो, शेतीची कामे टाकून संसार उपयोगी जिन्नस गोळा करणे त्याला शक्य होत नसे. याशिवाय पावसाळ्यात नद्यांना येणारे पुर पुरांमुळे होणारी नैसर्गिक पडझड ,त्यामुळे गावांचे संपर्क ही तुटायचे. त्यामुळे घरात कुठल्या दैनंदिन वापराच्या जिन्नसांची कमतरता होऊ नये, यासाठी कोकणातील शेतकरी आवश्यक जिन्नस पावसाळ्यात भरून ठेवत होता. या गरजेतूनच "आगोट "ही संकल्पना पुढे आली या त्यामुळे आगोटीची तयारीही मार्च महिना संपत आला की सुरू होते पावसाळ्यात चार महिन्यांसाठी संसाराला लागणारे साहित्याची जुळवाजुळव उन्हाळ्याच्या शेवटी केली जाते. या जीवनावश्यक वस्तूंनाच कोकणातील ग्रामीण भागात अगोट म्हणतात. ही बेगमी केली की शेतकरी शेतीची कामे करायला निर्धास्त होत असत. पण आता निसर्गाचा समतोल ढळला आहे त्यात विस्तारण्याच्या नावाखाली जमीनी गेल्या सिडकोला पण तरीही पावसाळ्यात तीन-चार महिने पुरेल इतका दैनंदिन जीवनाला लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करून अनेक गृहिणी आपली आवड बेगमी करून घेतात. त्यामुळे पनवेल ,पेण ,अलिबाग, उरण या तालुक्यांमध्ये कडधान्य खरेदी करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. वाल, चवळी, हरभरे, मूग अशी कडधान्य बाजारामध्ये विक्रीसाठी आली असून त्यांची योग्य ती पारख करून महिलावर्गाची खरेदी सुरू आहे .त्याचप्रमाणे सुकी मच्छी सुकट ,वाकटी, बोंबील अंबाड, इत्यादी सुक्या मच्छीची ही मागणी बाजारात मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचबरोर मिरची ,गरम मसाला, हळद पावडर करण्यासाठी ची गृहिणींची लगबग सुरू आहे.

पावसाळ्यात लगणारे हे जिन्नस, आताच्या या मार्च एप्रिल च्या उन्हात कडकडून तापवून हवाबंद डब्यात ठेवले जातात. आणि आगोटी साठी निश्चिंत होतात.

## निवडक

### पाडव्यानिमित्त भव्य शोभा यात्रेचे आयोजन

**वसई** : आमची वसई सामाजिक संस्थेतर्फे दि. ३० मार्च रोजी येणाऱ्या गुढीपाडव्या निमित्त वसईचा गुढीपाडवा हा उपक्रम राबविण्यात येणार असून, त्याअंतर्गत भव्य शोभा यात्रा आणि पारंपरिक वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या सगळ्यांनी पारंपरिक वेशभूषेत यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या शोभयात्रेत आपल्या दुचाकी, तीन चाकी व चार चाकी वाहनांना सजवून सहभाग घेता येणार आहे. तसेच या उपक्रमाअंतर्गत 'बाईक सजवणे' व 'उत्तम वेशभूषा' स्पर्धा होणार असून त्यासाठी महिला, पुरुष आणि लहान अश्या तीन गटातून प्रत्येकी चार बक्षीसे देण्यात येणार आहेत. शोभायात्रेची सांगता सकाळी ११:३० वाजता बक्षीस वितरणाने वसई किल्ल्यात होईल.सर्व सहभागींना "आमची वसई" तर्फे आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे.

### वाहनांना एचएसआरपी बसविण्याचे आवाहन

**कोल्हापूर** : दि. १ एप्रिल २०१९ नंतर नोंदणी झालेल्या वाहनवितरकाने एचएसआरपी बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या वाहनांना एचएसअरपी बसविण्यात आलेली नाही, अशा वाहनधारकांनी तात्काळ संबंधित वाहन वितरकाशी संपर्क साधून वाहनास एचएसअरपी बसवण्याची कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी केले आहे. शासनाकडून वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी दि.३१ मार्च यंत बसविण्याचे निर्देश देण्यात आले होते. आजपर्यंत जुन्या वाहनांना एचएसअरपी बसविण्याचे कामकाज फारच कमी प्रमाणात पूर्ण झाल्याने, सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना एचएसअरपी बसविण्यासाठी दिनांक ३०पर्यंत नव्याने मुदतवाढ देण्यात आली आहे.

### राधानगरी तालुक्यात पाद्यपूजन सोहळा

**बिद्री** : सिद्धगिरी संस्थान कणेरी मठाच्या विद्याचेतना प्रकल्पांतर्गत विद्या मंदिर मजरे कासारवाडा येथे पाद्यपूजन सोहळा आयोजन करण्यात आला होता. मुलांच्यात संस्कारक्षम गुण निर्माण व्हावेत, या स्वामीजींच्या संकल्पनेतून जिवंतपणे आई वडिलांचे पाद्यपूजन व्हावे, यासाठी विद्याचेतना प्रकल्पाची स्थापना करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या संकल्पनेतून शाळेच्या स्थापनेपासून सर्वात प्रथमच वि. मं. मजरे कासारवाडा या शाळेत पाद्यपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी गावातील शिक्षक पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्वासात घेऊनच कोल्हापूर हद्दवाढीचा निर्णय

## उपमुख्यमंत्र्यांसोबत हद्दवाढीबाबत पुन्हा बैठक होण्याची शक्यता : आ. क्षीरसागर

**मुंबई** : कोल्हापूर नगरपालिकेचे दि. १५ डिसेंबर १९७२ रोजी महानगपालिकेत रूपांतर करण्यात आले. परंतु, महानगरपालिकेत रूपांतर करताना नगरपालिकेच्या असणाऱ्या क्षेत्रफळावरच रूपांतर झाल्याने महानगरपालिकेची हद्दवाढ झाली नाही. सन १९७२ पासून एक इंचही हद्दवाढ झाली नसल्याने कोल्हापूरच्या विकासावर मर्यादा येत आहेत. त्यामुळे कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार राजेश क्षीरसागर यांनी केली.

आमदार राजेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यानुसार या मंगळवारी मंत्रालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत दुसरी बैठक पार पडली. या बैठकीत दोन्ही बाजूच्या नागरिकांना विश्वासात घेवून हद्दवाढीबाबत निर्णय घेण्यात येईल. हद्दवाढीबाबत शासन सकारात्मक असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीतीत पुन्हा बैठक होण्याची शक्यता असून, यामध्ये हद्दवाढीबाबत निर्णय होण्याची आशा असल्याची माहिती राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार राजेश क्षीरसागर यांनी दिली.

या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार राजेश क्षीरसागर, आमदार चंद्रदीप नरके, आमदार अमल महाडिक, नगर विकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव १ असीमकुमार गुप्ता, अप्पर मुख्य सचिव २ के. एच. गोविंदराज, महानगरपालिका आयुक्त के मंजूलक्ष्मी, नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक विनय झगडे, मस्कर, संजय चव्हाण आदी कोल्हापूर महानगरपालिका व संबधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार राजेश क्षीरसागर यांनी, हद्दवाढ ही एक नैसर्गिक प्रकिया असून, याशिवाय विकासाला चालना मिळणार नाही. हद्दवाढी अभावी शहरवासीयांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शहरालगतची काही गावे शहराशी एकरूप जीवन जगत आहेत. हद्दवाढी अभावी भकास होत चालले आहे.

समर्थक आणि विरोधक अशा दोन्ही बाजूच्या नागरिकांना विश्वासात घेवूनच हद्दवाढीबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार राजेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. सर्वांना विश्वासात घेऊन हद्दवाढ करण्याबाबत बैठकीत एकमत झाले असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पुन्हा बैठक होण्याची शक्यता आहे.

### कोल्हापूरवासीयांचे प्रबोधन करणे गरजेचे




शहराची हद्दवाढ झाली तर नक्कीच महानगरपालिकेचे आर्थिक उत्पनात वाढ होऊन खऱ्या अर्थाने शहराचा विकास साधता येणार आहे. यासह केंद्र व राज्य शासनाच्या लोकसंखेच्या आधारावरील सर्व विकासकामांना निधी मिळू शकणार आहे. आपणही हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या आहेत. हद्दवाढीबाबत शासन सकारात्मक असून, हद्दवाढीबाबत विरोधक नागरिकांना असलेले गैरसमज दूर करण्यासाठी प्रबोधन करणे गरजेचे आहे.

# विद्यापीठाच्या अधिसभेला विद्यार्थ्यांची उपस्थिती महत्त्वाची

## थेट प्रक्षेपणाची मनसेची मागणी

**जळगाव** : विद्यापीठांमध्ये होणाऱ्या अधिसभा (सिनेट मीटिंग) या शैक्षणिक व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाच्या असतात. या बैठकीत विद्यापीठाच्या कारभाराशी संबंधित विविध धोरणे, विद्यार्थ्यांशी निगडित निर्णय आणि प्रशासकीय बाबी निश्चित केल्या जातात, असे असतांना या सभांना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास बंदी घालण्यात आली आहे. तरी सिनेटच्या या सभांना विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याची तसेच या सभेचे थेट प्रक्षेपण करण्याची मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष जमील देशपांडे यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू यांना एका निवेदनाव्दारे केली. या निवेदनाची प्रत राज्यपाल यांना देखील मेलव्दारे पाठवण्यात आल्याची माहिती जमील देशपांडे यांनी दै. 'नवशक्ति'शी बोलतांना दिली.

आपल्या निवेदनात जमील देशपांडे म्हणतात की, लोकशाही प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आपल्या देशाने अनेक सकारात्मक पावले उचलली आहेत. त्यात भारतीय संसद व विधानसभांचे कार्य थेट प्रक्षेपित होते. लोकसभा व राज्यसभेतील कामकाज देशभरातील नागरिकांना थेट पाहता येते. महाराष्ट्र विधानसभेच्या कामकाजासाठी प्रेक्षक गॅलरीची सोय देखील आहे, जिथे नागरिकांना थेट सभागृहातील चर्चा पाहता येते. न्यायालयीन प्रक्रिया देखील पारदर्शक केली जात आहे. सर्वोच्च न्यायालय आणि काही उच्च न्यायालये यांचे कामकाज आता थेट प्रक्षेपणाद्वारे नागरिकांना पाहण्याची संधी मिळत आहे. महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील नागरिकांना बैठकींना हजर राहण्याची परवानगी असते.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठांमध्ये देखील अधिसभा बैठकींसाठी विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याची व सभेचे थेट प्रक्षेपण करण्याची परवानगी द्यावी. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव होईल व विद्यापीठ प्रशासनाच्या कामकाजाबाबत पारदर्शकता राहील. सिनेट सदस्य विद्यार्थ्यांचे प्रश्न कसे व किती प्रभावीपणे मांडतात, हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना समजू शकेल, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवात होईल व भविष्यात जबाबदार नागरिक व सक्षम नेतृत्व घडेल. शासन आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यात जबाबदारी आणि उत्तरदायित्वाची जाणीव वाढेल.

### स्वतंत्र मुक्त शिक्षण विभाग सुरू करावे

सध्या अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी आर्थिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कौटुंबिक कारणांमुळे नियमित महाविद्यालयीन शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी मुक्त शिक्षण हा एक प्रभावी पर्याय ठरू शकतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांसारख्या संस्थांनी मुक्त शिक्षणाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. युजीसीतर्फे 'मुक्त शिक्षण अभियान' प्रभावीपणे राबवले जात असून, त्याच धर्तीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने स्वतंत्र मुक्त शिक्षण विभाग सुरू करावा, अशी मागणी या निवेदनात केली आहे.

# अमली पदार्थ तस्करीप्रकरणी दोघांना पोलीस कोठडी

**कराड** : एमडी या अमली पदार्थ तस्करीमध्ये कराड शहर पोलिसांनी एका बड्या व्यावसायीकाच्या मुलाला पुणे विमानतळ परिसरातून अटक केली होती. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने येत्या २७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सुजल उमेश चंदवानी, सौरभ संदीप राव असे पोलीस कोठडी मिळालेल्या संशयिताचे नाव आहे.

गेल्या महिन्यापूर्वी कराड शहर व परिसरामध्येही पोलिसांनी ओगलेवाडी येथे छापा टाकून (एमडी) अमली पदार्थाची तस्करी करत त्यांची विक्री करणाऱ्यांना अटक केली होती. या प्रकरणी पोलिसांनी गौरव राव याला कराडच्या गजानन हौसिंग सोसायटी येथून अटक केली. मात्र सुजल चंदवाणी पोलिसांना गुंगारा देत होता. त्यानंतर पोलिसांना तो पुण्यात असल्याची माहिती मिळताच पोलीस पथकाने पुणे विमानतळ परिसरातून सुजल चंदवानी याला अटक केली. सुजल चंदवानी याला सोमवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दि. २७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# अस्वलाच्या हल्ल्यात ग्रामस्थ गंभीर जखमी

**कराड** : पाटण तालुक्यातील कोयना विभागातील अतिदुर्गम व चांदोली अभयारण्याच्या कोअर झोनमधील कोळणे, ता पाटण गावात अर्जुन मानू डांगरे यांच्यावर जंगली अस्वलाने हल्ला करून त्यांना गंभीररित्या जखमी केले आहे. त्यांच्यावर हेळवाक प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार केल्यानंतर अधिक उपचारासाठी कराड येथील कृष्णा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

सातारा-सांगली जिल्ह्यांच्या सह्याद्री पर्वत रांगांच्या सीमेवरील चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या हेळवाक वनपरिक्षेत्रातील अतिदुर्गम ठिकाणी वसलेल्या कोळणे गावातील अर्जुन



मानू डांगरे (८०) हे मोबाइलला रेंज येत नसल्याकारणाने सोमवारी कोळणे गावच्या खासगी क्षेत्रातील मोबाइल नेटवर्क असलेल्या ठिकाणी फोन करण्यासाठी गेले होते. त्याठिकाणी ते फोनवर नेटवर्क शोधत असतानाच त्यांच्यावर अचानक जंगली अस्वलाने हल्ला चढवत त्यांना गंभीररित्या जखमी केले. या हल्ल्यात डांगरे यांच्यावर हातावर व डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. यावेळी डांगरे यांनी आरडाओरडा केल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी त्यांच्या मदतीसाठी धाव घेतल्यामुळे अस्वलाने तेथून धूम ठोकली. यावेळी या ग्रामस्थांनी अर्जुन डांगरे यांना तात्काळ उपचारासाठी हेळवाक प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले. या हल्ल्यात अर्जुन डांगरे यांच्या हातावर व डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांची प्रकृती नाजूक असल्याचे समजते आहे.

# बाळूमामांच्या भंडारा यात्रेची जय्यत तयारी

**मुदाळ** : क्षेत्र आदमापूर, ता. भुदरगड येथील सद्गुरू बाळूमामांच्या भंडारा यात्रेला प्रारंभ झाला आहे. रथ मिरवणूक, पालखी सोहळा, भाकणूक व महाप्रसाद या मुख्य कार्यक्रमांना लाखो भाविक उपस्थित राहणार आहेत. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर समितीने यात्रेची जय्यत तयारी केली असल्याची माहिती मंदिर समितीच्या कार्याध्यक्षा रागिनी खडके यांनी दिली.



भाविकांच्या वाहनांसाठी दोन तळ तयार केले असून, त्यात हजारो वाहने थांबतील अशी व्यवस्था आहे. गर्दी लक्षात घेऊन नियमित टॉयलेट, बाथरूमशिवाय जादा टॉयलेट व्हॅनची सोय करण्यात आली आहे. बाळूमामांचे रांगेतून दर्शन मिळावे, यासाठी पंढरपूर देवस्थानप्रमाणे रांगेत बैठक व्यवस्था केली आहे.

भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये, महाप्रसादाचा लाभभक्तांना सावलीत घेता यावा, यासाठी भव्य मंडप उभारण्यात आला आहे. महाप्रसादावेळी भक्तांना मिनरल वॉटरची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे. रथ मिरवणूक व पालखी सोहळा शांततेत होण्यासाठी नियमावली करण्यात आली आहे. पालखी सोहळा डॉल्बीमुक्त होणार आहे. यात्रा शांततेत व सुरक्षितेत पार पाडण्यासाठी भाविक, ग्रामस्थ, विविध संस्था, व्यावसायिक, व्यापारी, कर्मचारी तरुण मंडळे, विविध विभागांचे पदाधिकारी यांनी सहकार्य करावे, असे आवाहनही कार्याध्यक्षा रागिनी खडके यांनी केले.

यावेळी मानद अध्यक्ष धैर्यशील भोसले, सचिव संदीप मगदूम, सरपंच विजयराव गुरव, दत्तात्रय पाटील, दिनकरराव कांबळे, विश्वस्त शामराव होडगे, रामाण्णा मरेगुदरी, बसवराज देसाई आदी उपस्थित होते.

# महाबोधी महाविहार लवकरात लवकर मुक्त करा !

## नांदेडमधील महामोर्चात भिक्खू व अनुयायांची एकमुखी मागणी

**नांदेड** : बिहार सरकारने टेम्पल ॲक्ट १९४९ हा कायदा रद्द करून बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, या मागणीसाठी मंगळवारी नांदेड शहरातून महामोर्चा काढण्यात आला. नांदेडच्या नवा मोंढा मैदान येथून हजारोंच्या संख्येने निघालेला महामोर्चा दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. येथे बौद्ध भिक्खू आणि शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत बिहार सरकारला निवेदन पाठविण्यात आले.

भारताचा महान राजा सम्राट अशोक यांनी भगवान बुद्ध यांचा विचाराचा प्रचार व्हावा; यासाठी बिहार येथील गया जिल्ह्यात भगवान गौतम बुद्ध यांच्या महाबोधी विहाराची स्थापन केली होती. मात्र, बिहार सरकारने १९४९ मध्ये बुद्धगया मंदिर व्यवस्थित नियंत्रणासाठी बुद्धगया टेम्पल कायदा तयार केला. यामुळे विहाराचे व्यवस्थापन अन्य प्रवर्गातील समुदायाकडे गेले आहे.

ज्याप्रमाणे चर्च, गुरूव्दारा, मंदिर याचे त्या/त्या समुदायाकडून व्यवस्थापन केले जाते. त्याच पद्धतीने महाबोधी विहाराचा संपूर्ण प्रशासकीय ताबा बौद्ध समुदायाकडे द्यावा, १९४९ हा कायदा रद्द करावा, या मागणीसाठी देशभरात आंदोलन सुरू झाले आहे. या अंतर्गत नांदेड येथेही मंगळवारी बौद्ध समाज, भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलाच्या वतीने नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात आला.

नवा मोंढा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून सुरू झालेला महामोर्चा महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा यांच्यासह अन्य महापुरुषांना अभिवादन करून दुपारी भर उन्हात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चातील समाज बांधवांकरिता प्रत्येक चौकात पाणपोईची व्यवस्था करण्यात आली होती. सदर महामोर्चात जिल्हाभरातील हजारो बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते.

# दहशत माजवणाऱ्या चौघांवर तडीपारीची कारवाई

**पुणे** : कोयत्याचा धाक दाखवून आणि तोडफोड करून वाघोली भागात दहशत माजवणाऱ्या चौघांना पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केले आहे. रोहन ऊर्फ मोन्या रामप्यारे गिरी (२०), विकास राजू जाधव (२०), आदित्य दीपक कांबळे (१८), वैभव सुभाष पोळ (१८) अशी तडीपार केलेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी पुणे-अहिल्यानगर रोड, वाघोली, बकोरी फाटा, वाघोली बाजारतळ, तसेच आसपासच्या भागात दहशत माजवणे, गंभीर दुखापत करून तोडफोड करणे अशा स्वरूपाचे गुन्हे केले आहेत. हे गुंड नागरिकांना कायम दहशतीखाली ठेवून वारंवार त्रास देत होते. त्यामुळे स्थानिक लोक नेहमी दडपणाखाली वावरत होते. या गुंडांवर वचक बसावा, या उद्देशाने मिळालेल्या प्रस्तावानुसार उपायुक्त जाधव यांनी या टोळीला पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे.

### ठाणे ग्रामीण पोलिसांचा नाविन्यपूर्ण उपक्रम

(छाया : दीपक कुरकुंडे)



**ठाणे ग्रामीण पोलिसांच्या वतीने 'आपले पोलीस ठाणे ग्रामीण पोलीस' असा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सदर उपक्रमांतर्गत एक डिजिटल व्हॅनद्वारे जागरूकता व प्रबोधन करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांनी माहिती दिली.**

# 19 वर्षीय विवाहित तरुणीवर चाकूचा धाक दाखवीत बलात्कार ; परप्रांतीय आरोपी तीन तासात ताब्यात

## विभागातून पो.नि.सचिन कुलकर्णी व त्यांच्या पथकाचे होत आहे कौतुक

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाटणसई येथील चाळीतील फिर्यादीच्या राहत्या खोलीत शनिवार 22 मार्च रोजी दुपारी 2.30 वाजण्याच्या सुमारास पीडित 19 वर्षीय परप्रांतीय विवाहित तरुणीवर चाकूचा धाक दाखवीत बलात्कार करण्यात आला. गुन्हा दाखल होताच बलात्कारी परप्रांतीय आरोपीस तीन तासाच्या आत पळून जाण्याच्या तयारीत असताना मोठ्या शिताफीने ताब्यात घेण्यात आले आहे. स.पो.नि.सचिन कुलकर्णी यांनी वेगात सूत्रे फिरवून केलेल्या कामगिरीचे नागोठणे शहर व विभागातून अभिनंदन व कौतुक होत आहे. नागोठणे पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, फिर्यादी पीडित 19 वर्षीय परप्रांतीय विवाहित तरुणी व आरोपी हे नात्यातील असून फिर्यादीचे पती व आरोपी हे एकाच कंपनीत कामाला आहेत. पीडितीचे पती घरात नसल्याचा फायदा घेत आरोपी याने शनिवार 22 मार्च रोजी दुपारी 2.30 वाजण्याच्या सुमारास पीडितीच्या घरात प्रवेश करून चाकूचा धाक दाखवून जबरदस्तीने शारिरीक संबंध करण्यास भाग पाडले. व झालेला प्रकार कोणाला सांगीतल्यास तुला व तुझे पतीला ठार मारेन अशी धमकी दिली. घाबरलेल्या पीडितेने 25 मार्च रोजी झालेला प्रकाराची कल्पना आपल्या पतीला देताच त्यांनी नागोठणे पोलिस ठाण्यात धाव घेतली. वेगवान तपासासाठी दोन पथके रवाना – सदरील माहिती पो.नि.सचिन कुलकर्णी यांना मिळताच घटनेचे गांभीर्य ओळखून तपास आपल्याकडे घेत गुन्हा दाखल केला. व वेगवान तपासासाठी दोन पथके स्थापन करून तपास कार्यास रवाना केली.

पेण रेल्वे स्थानकात सापळा रचून आरोपी ताब्यात – आरोपी हा मध्यप्रदेश येथील असल्याने तो पळून जाण्याच्या बेतात असणार म्हणून त्याच्या मोबाईल लोकेशनच्या आधारावर वडखळ ते पेण दरम्यान पाठलाग करीत पेण रेल्वे स्थानक परिसरात सापळा रचून आरोपीस ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी करून पोलिसी खाक्या दाखविताच त्याने गुंहयाची कबुली दिल्याने अटक करण्यात आली.

या पथकांनी केली साहसी कामगिरी – रायगड पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अप्पर पोलिस अधीक्षक अभिजीत शिवथरे,रोहा उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी,पोलिस हवालदार संतोष म्हात्रे, अशोक म्हात्रे व चंद्रशेखर नागावकर,पो.शि. स्वप्नील भालेराव,चालक मिलिंद महाडीक या पथकांनी साहसी कामगिरी केली.

आरोपीस चार दिवसांची पोलिस कोठडी– सदरील आरोपीस बुधवार 26 मार्च रोजी रोहा येथील न्यायालयात हजर केले असता ; त्याला पुढील तपासासाठी 29 मार्च पर्यंत चार दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

परराज्यात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीस तीन तासाच्या आत मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन केलेल्या साहसी कामगिरीबद्दल स.पो.नि.सचिन कुलकर्णी व त्यांच्या पथकाचे नागोठणे शहर व विभागातून अभिनंदन व कौतुक होत असून सदरील घटनेची नागोठणे पोलिस ठाण्यात गू.र.नं. 33/25 भा.न्या.सं.2023 चे कलम 64,351 (2 व 3) अशी गुन्हा झाली असून पुढील तपास सहा.पो. नि. सचिन कुलकर्णी करीत आहे.

# रमजानच्या माध्यमातुन सर्वच जाती धर्मातील लोकांना चांगला संदेश देण्याची आपणाला संधी मिळते :- भाई विष्णुपंत घोलप

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने मंगळवार दि.२५/०३/२०२५ रोजी रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजन दर्गा मज्जिद,हजरत राज महमंद चौक ता.पाटोदा येथे करण्यात आले होते. या वेळी रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजक भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात रमजान महिना हा मानवाच्या मनातील वाढलेली दरी कमी करण्यासाठी तसेच परस्परामध्ये स्नेह भाव वाढविणारा हा पवित्र महिना असुन या रमजान महिन्यात मानवाला संयम, शांतता, त्यागाची भावना, माणसाचा चांगुलपणा दाखविण्याचा तसेच उपवासाच्या माध्यमातुन संयमाबरोबर आपल्या आत्म्याला शुध्द करण्याचा देखील संदेश रमजानच्या माध्यमातुन मानवाला देण्यात आलेला आहे. रमजानच्या पवित्र महिन्यात आपल्या कडुन झालेल्या चुकीला क्षमा मागण्याचा व इतरावर दया करण्याचा आणि दान धर्म करुन श्रध्देने प्रार्थना करुन अल्लाह कडे (परमेश्वराकडे) सर्वांसाठी दुवा मागितला जातो. या रोजा ईफ्तार पार्टीला दलित मित्र एकबाल पेंटर, काँ.महादेव नागरगोजे, शेख सादेक भाई नदाफ, दिलीपराव गाडे, शिवसेना तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, राष्ट्रीय काँग्रेसचे तालुका अध्यक्ष राहुल जाधव, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते अड.सय्यद वहाब, मराठी पत्रकार परिषदचे तालुकाध्यक्ष अजय जोशी, शब्बीर पटेल, शेख जव्वाद बिल्डर, शम्मु पटेल, शेख इम्रान नुर, पत्रकार कादर भाई मकराणी, पत्रकार इद्रीस चाऊस, जमशेर पटेल, शेख शहानवाज सर, शेख जुनेद, पत्रकार हमीखान पठाण, डॉ.हरिदास शेलार, डॉ.रविंद्र




गोरे, पाटोदा तालुका पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष पत्रकार सचिन गायकवाड, पत्रकार शेख जावेद, शेख अब्दुल रहेमान, शेख यासीन भाई, संदीप जाधव, रामदास भाकरे, अजिज मकराणी, शिवाजी राख, आबासाहेब भोसले, अजय कांकरिया, पत्रकार शेख महेशर, पत्रकार शेख अजीज, पत्रकार विजय जाधव, पत्रकार सय्यद फय्याज, नरहरी पवळ, औरसमल पिंटु, मुकरम पठाण, नासेर भाई, सय्यद भाई मुंबईवाले, पठाण अकबर भाई, ताहेर पठाण, ईस्माईल भाई, सय्यद रहीम, चक्रपाणी जाधव, वसंत काळे, सोपानराव जायभाय, शेख जावेद, फकरूद्दिन भाई, लक्ष्मण घोलप, भिमराव घोलप, बंडु तरटे यांच्या सह इतर बहुसंख्येने हिंदू मुस्लिम बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचलन सेवा सोसायटीचे संचालक सय्यद सज्जाद (साजेद भाई) यांनी केले. या वेळी माजी सरपंच सय्यद वहाब भाई, सादेक भाई नदाफ, शेख इम्रान नुर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व भाई विष्णुपंत घोलप यांचे मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने आभार व्यक्त केले.